# उरोस, स्कायट्रेन,मिरॅकल गार्डन

## गमती देशोदेशींच्या २

अनामिका बोरकर









**या मित्रांनो! सुंदर पुस्तकांचा मनमुराद आनंद लुटा!!**

# गमती देशोदेशीच्या -२

# उरोस, स्कायट्रेन, मिरॅकल गार्डन

## हे पुस्तक फ़ुकट नाही

यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

पण तरीही आम्ही ते वाचकांना विनामूल्य घेऊ देतो.

कारण ई पुस्तक एकदा बनलं की एकजण वाचो वा एक लाख. आमचं काहीच कमी होत नाही.

उलट आनंद वाढतो. मजा येते.

पण तुम्ही ते फ़ुकट का घ्यावं?

तुम्हालाही काही देता येईल.

असे काही द्या ज्याने ई साहित्यच्या लेखकांना, टीमला आणि तुम्हालाही आनंद मिळेल

आणि तुमचं काहीच कमी होणार नाही.

तुम्ही आशिर्वाद आणि शुभेच्छा द्या. लेखकांना फ़ोन करून दाद द्या

आपल्या मित्रांचे मेल पत्ते आम्हाला द्या. मित्रांना हे पुस्तक मेल आणि Whatsapp करा

ई साहित्यचे फ़ेसबुक पेज, इन्स्टाग्राम, टेलिग्राम यांवर स्वतः जा व इतरांना आमंत्रित करा. सोशल मिडियावर ई साहित्यचा प्रचार करा.

सर्वात बहुमोल अशा तुमच्या सूचना द्या

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत ज्याने लेखकाला व ईसाहित्य टीमला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होईल. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे व त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा. अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करीत आहे

# गमती देशोदेशीच्या -२

## उरोस, स्कायट्रेन, मिरॅकल गार्डन

लेखिका

**अनामिका धनंजय बोरकर**

# गमती देशोदेशीच्या -२

# उरोस, स्कायट्रेन, मिरॅकल गार्डन

## लेखिका... अनामिका धनंजय बोरकर

अ / १८,वूडलॅंड अपार्टमेंट, गांधी भवन मार्ग,कोथरुड,पुणे ४११०२९.
दूरध्वनी:९८१९८६९०९०.
ई-मेल: bodhamu@gmail.com

**मुखपृष्ठ: कनक वाईकर (7738950216)**

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण व नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखिकेची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

# प्रकाशक : ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.in
www.esahity.com
esahity@gmail.com
eSahity Pratishthan
eleventh floor
eternity
eastern express highway
Thane. 400604
**प्रकाशन : ३० नोव्हेंबर २०२०**

©esahity Pratishthan®2020

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.


हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.



* सिंगापूरमध्ये असताना महाराष्ट्र मंडळाच्या अनेक उपक्रमात सक्रिय सहभाग घेण्याची संधी मिळाली. महाराष्ट्र दिनानिमित्त सादर केलेल्या महाराष्ट्राच्या स्टॉलचे आयोजन करताना खूप मोठमोठ्या भारतीय मान्यवरांची जवळून भेट घेता आली. सिंगापूर सरकारने आयोजित केलेल्या भारताच्या संस्कृतिक प्रदर्शनात महाराष्ट्राचे दिमाखदार पॅवेलियन, महाराष्ट्रातील वस्तूंची सिंगापूर मध्ये विक्री, सिंगापूरमधील मान्यवरांच्या त्यामुळे झालेल्या ओळखी अविस्मरणीयच! महाराष्ट्र व भारतासंबंधी वेगवेगळ्या सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी पुढाकार घेणे, त्यासाठी येणाऱ्या पाहुण्यांची यथोचित सरबराई करणे हाही एक छंदच.

* कॉलेज जीवना पासूनच नाटकाबद्दल खूप प्रेम. नाटकाच्या संदर्भात दिग्दर्शन करणे, नेपथ्य करणे याची जास्त आवड. महाराष्ट्र मंडळाच्या नाटकांबरोबरच भारतातून तिथे सादर होणा-या नाटकांसाठी नेपेथ्य करताना खूप शिकता आले. खूपशा प्रथितयश नट नट्यांना जवळून बघता आले आणि ब-याच ठिकाणी त्यांना वाटाड्या म्हणून सिंगापूर दर्शनही घडवण्याचा योग आला.

* वाचन मनापासून आवडते. पण कोणीही विषय विशिष्ट असे नाहीत. लेखक तर सगळेच प्रिय. कारण प्रत्येकामध्ये काहीतरी लिखाणाचे वेगळे कौशल्य लपलेले असते. त्यामुळे वेगवेगळ्या लेखकांची विविध विषयांवरची पुस्तके वाचणे ह्यातली गंमत काही वेगळीच. मला ती आवडते. तरीही त्यातल्या त्यात पुल आणि मंगला गोडबोले आवडते लेखक. ऐतिहासिक पुस्तके हा वीक पॉईंट म्हणता येईल .


उरोस
मनांत घर केलेलं
तरंगतं अद्‌भुत खेडं...

लहान असताना आपल्या मनात किती गंमतशीर कल्पना असतात आणि तेंव्हा त्या अगदी खऱ्याखुऱ्याही वाटतात. आता माझ्याच मनात पृथ्वीच्या दक्षिण गोलार्धात रहाणाऱ्या माणसांबद्दल किती गंमतीदार कल्पना होती बघा! मुळात पृथ्वी सरळ सपाट नसून गोलाकार आहे हे शाळेत गेल्यावर कळले. नंतर पृथ्वीचा गोल हा अखंड नसून दोन गोलार्ध जोडून बनलेला आहे, दोन गोलार्धांचा जुळलेला बेस— विषुववृत्त-- म्हणजे माणसांना पाय ठेवण्यासाठी उपयोगात येणारी जमीन गोलाच्या मध्यभागी आहे ह्या गोष्टींची नंतर माहिती झाली. मग डोक्यात प्रश्न डोकावला की आपण वरच्या गोलार्धात आहोत म्हणून आपण सरळ जमिनीला पाय व वरच्या बाजूला डोके असे उभे असतो पण त्या मधल्या जमीनीखाली म्हणजेच काल्पनिक विषुववृत्ताखालच्या भागात रहाणारी माणसे उभी रहाताना आपल्यासारखी सरळ उभी असतात का खाली डोके वर पाय करून उभी असतात... छताला चिकटणाऱ्या पालीसारखी..? ही लहानपणची कल्पना मात्र खूप दिवस मनात पक्की होती. ती खरी का खोटी ते पहाण्यासाठी विषुववृत्त ओलांडून जाणे भाग होते.

विषुववृत्ताच्या खाली नाही पण त्याच्या खूपच जवळ असलेल्या सिंगापूरच्या वास्तव्यामुळे प्रवास करण्याच्या संधी उपलब्ध होत गेल्या, नवीन माहिती गोळा करण्याची इच्छा मनात उत्पन्न झाली तसा भूगोलासारखा अत्यंत नावडता विषय वाचनात समाविष्ट करावाच लागला. त्यातूनच पृथ्वीच्या वेगवेगळ्या भागांची ओळख होत गेली व मुख्य म्हणजे विषुववृत्ताच्या रेषेखालील भागाबद्दल मनात कुतूहल निर्माण झाले. आफ्रिकेचा दक्षिण भाग, ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड, दक्षिण अमेरिका... अशा बऱ्याच विषुववृत्ताखालील देशांविषयी माहिती वाचली होती. यातील बरेचसे देश तसे सिंगापूरला जवळ. पण दक्षिण अमेरिका खूपच दूर. इग्वासू सारखा महाकाय धबधबा, ऍमेझोनसारखी विस्तीर्ण नदी, माचूपिचू, नास्काच्यारेषा... काय अन काय...! अशी बरीच आश्चर्ये दक्षिण अमेरिकेत एकवटली होती म्हणून आम्ही तिथे जायचं ठरवलं. दक्षिण अमेरिका प्रचंड मोठा व बऱ्याच देशांचा मिळून बनलेला आहे हे कळल्यावर तिथे जायचा विचार नाही म्हटलं तरी थोडा लांबणीवरच पडत होता. पण शेवटी तिकडचे सगळे देश जरी नाही तर नाही, पण बरंच काही दाखवणारी "अनुभव हॉलीडेज"ची टूर आम्ही घेतली.


UBICACION 3809 m.s.n.m
SUP. TOTAL 8560 Km²
LARGO TOTAL 165 Km.
ANCHO TOTAL 60 Km.
PARTE ESTRECHA 600 mts
PROF. MAXIMA 274 mts
VOLUMEN 896000,000 m³
TEMP. PROMEDIO 9° C
LAGO TITIKAKA
WIÑAYMARCA
ISLAS LOS UROS
PERU
BOLIVIA
Cusco
Arequipa
Juliaca
Sillustani
PUNO
Chucuito
Plateria
Acora
Ilave
Juli
Pomata
Yunguyo
Zepita
Desaguadero
Guaqui
La Paz
Huarina
Achacachi
Carabuco
Escoma
Pto Acosta
Tilali
Conima
Moho
Vilquechica

अर्जेंटिना, चिले, पेरू आणि ब्राझिल असे चार देश एकवीस दिवसात आम्ही पाहिले. अकरा जणांचा आमचा आजी आजोबा झालेला सिनीयर सिटीझन्सचा चमू "अनुभव"चे अनुभवी व उत्साही संचालक मयुरेश भट यांच्यासह मुंबईहून निघाला. जाहीर न करताही आमची ही "सिनीयर सिटिझन्सची स्पेशल" टूर होती. सहलीतील मंडळी पहिल्या दिवसापासूनच एकमेकात पूर्ण मिसळून गेली. सगळयांच्याच गरजा, छोटी छोटी दुखणी, औषधे, पथ्ये सारखीच असल्याने संकोच वा ओढाताण नव्हती. उलट खूप मोकळेपणा होता. राहता राहिला जेवणाचा प्रश्न! मयुरेशच्या उत्तम कोऑर्डिनेशने सर्वांच्या - माझ्यासारख्या शाकाहारीच्या- बाबतीतही तो सहज सुटला- अगदी भरल्या पोटाने.


अर्जेंटिना-चिले मार्गे पेरूला आम्ही कधी पोहोचलो ते कळलेच नाही इतके हे दोन्ही देश सुंदर आहेत. आमचे डोळे व कॅमेरा पूर्ण तृप्त होऊन गेले. आता पेरू काय गंमती दाखवतो ते पहायची उत्सुकता लागली होती. पेरु हा देश निसर्गरम्य व सुंदर आहे. ॲमेझॉन व तिच्या काठच्या जंगलांमुळे एक प्रकारची निसर्गसौंदर्याची उधळणच झाली आहे. किती पहाल तेवढं थोडंच अशी स्थिती होऊन जाते. लीमा, इंकांच्या संस्कृतीमुळे गाजलेलं कुस्को, ही देखणी शहरं पाहून आम्ही ॲमेझॉनची उपनदी 'तंबोपाटा'च्या काठावरील

नैऋत्य ऍमेझोनियन रेझर्वा (राखीव जंगल) पहाण्यासाठी ‘इंकाटेरेन’ या ठिकाणी वास्तव्य केले. दोन दिवस जंगलात व रात्री नदीपात्रात भरपूर भटकंती करून नवीन वनस्पती, प्राणी व पक्षी मनात व फोटोत बंदिस्त केले. कॅनोपी वॉकला तर जमिनीपासून शंभर फूट उंचीवरून झाडांच्या मेघडंबरीतून चालताना छातीत धडधडत होते आणि मजाही येत होती. पेरूमधील माणसे गरीब असली तरी खूप प्रेमळ, अगत्यशील व प्रवाशांची व्यवस्थित काळजी घेणारी असल्याने जंगलात रहाणे खूपच सुखद झाले. मंगोलियन नाही पण तिबेटी लोकांशी साम्य असणारी ही माणसे बेताची उंची व अंगलटीची पण काटक दिसली.

जंगलवास्तव्य संपवून आम्ही कुस्कोला परतलो. माचुपिचू, कॅथिड्रल, कोरिकांचा (इंकांचे प्राचीन सूर्यमंदिर) पाहून ‘पुनो’ च्या दिशेने निघालो. संपूर्ण दिवसाचा बसचा प्रवास तसा रखरखीतच. डोंगर, दऱ्या, नद्या पार करत, रेल्वे लाईनच्या सोबतीने, मध्ये मध्ये थांबत, काहीतरी वेगळे पहात आम्ही संध्याकाळी पुनोला पोहोचलो. एवढं करून इथं बघायचं काय, .. तर ‘लेक टिटिकाका’ व त्यातील तरंगती खेडी! बहुतेकांना हॉंगकॉंग बॅंकॉकचे तरंगते बाजार, तरंगती घरं, व्हेनिस शहरात पडावातून फिरणे आठवत होतेच. त्यामुळे लेक टिटिकाकातल्या तरंगत्या वस्त्या पहायला इतका त्रास सहन करून येण्याची गरज काय असे

वाटणे स्वाभाविकच होते. त्यात पुनो हे समुद्रसपाटीपासून ११०००-११५०० फुट उंचीवर, लेक टिटिकाकाच्या किनाऱ्यावर वसलेलं छोटस गाव. त्यामुळे तिथे पोहोचल्यावर दिवसभराच्या प्रवासाने थकले भागलेले आम्ही सगळे हाय आल्टिट्यूड सिकनेसने बेजार झालो. हेलपाटत, हा- हूः करत सगळे जेमतेम खोल्यांत पोहोचलो. गाव पहायला जाण्याची एनर्जी कुणातच नव्हती व गावातही प्रथमदर्शनी काही आकर्षक वाटलं नव्हतं.


दुसऱ्या दिवशी सकाळी ‘‘आता आलोच आहोत तर पाहू काय आहे ते’’ म्हणून सगळे बाहेर पडलो. तसे टिटिकाका तळे पुनोत शिरल्यापासूनच आमची सोबत करत होते. पण त्याची विशालता व सौंदर्य पुनोतल्या डॉकयार्डच्या शेजारील उंच टॉवरवरून बघायला मिळाले. ‘टिटिकाका’चा अर्थ रानमांजर किंवा बिबळ्या’. खूप उंचावरून आकाशातून पाहिल्यास या तळयाचा आकार सश्यावर झेप घालणाऱ्या रानमांजरासारखा दिसतो. पण शेकडो वर्षांपूर्वी मनुष्याला उंचावरून उडण्याची क्षमता नव्हती तेव्हा त्यांना या आकाराचे आकलन कसे झाले हे एक न उलगडणारे कोडेच आहे. समुद्रसपाटीपासून ११५०० फूट उंचीवरचं हे विशाल तळं अजूनही बोलिव्हिय़ा आणि पेरू या दोन देशांमधील दळणवळणासाठी वापरलं जातं.



अबब! केवढा प्रचंड विस्तार! अंदाजे ८३०० चौरस किमी एवढा तर खोली ३५० ते ९५० फुटापर्यंत! खरं तर याला तळं म्हणणं चूकच आहे. समुद्रामधल्या उंचच उंच लाटा नाहीत एवढे सोडले तर हे समुद्रापेक्षा विशालतेत जराही कमी नाही.

जवळ जवळ २५-२६ नद्या आपले जलवैभव याच्या ओटीत अविरत रिते करीत असतात. आणि ते मुक्त करणारी एकच नदी! तीही इतकी अरुंद की येणाऱ्या जेमतेम दहा टक्के पाण्याचा निचरा करते. पण अविरत वाहणारा वारा व उंचीमुळे मिळणारी सूर्याची दाहक उष्णता यामुळे उरलेले बहुतांश पाणी बाष्परूपाने परत हवेत मिसळते. त्यामुळे या तळ्याची मर्यादा कायम राहिली आहे - ऐकून मोठीच मजा वाटली. १०-१२ अंश सें. तपमानाचे काळसर निळे स्वच्छ पाणी व पाण्याच्या पोटात अनेक जलचर, वनस्पतींना आसरा देणारे हे तळे आपले दोन्ही काठ एका दृष्टिक्षेपात दाखवत नाही.

जेमतेम दोन बसगाड्या एकावेळी जाऊ शकतील अशा रस्त्यातून दुतर्फा उभी असणारी एक मजली, दुमजली घरे ओलांडत आम्ही तळ्याच्या काठी पोहोचलो. नुकतीच दुकाने उघडू लागली होती. छोट्यामोठ्या घरातून रोजच्या सकाळच्या कामांची लगबग चालू होती. त्यातून वाट काढत आम्ही तळ्याच्या काठी पोहोचलो. तिथे उभ्या असणाऱ्या बोटीत बसून लेक टिटिकाका बघायला निघालो. १२-१५ जणांना आरामात बसता येईल अशा बोटी उरोस बेटांपर्यंत प्रवाशांची ने-आण करतात. पुनोमधल्या वाटाड्याने सुहास्य मुद्रेने आमचे स्वागत केले. जवळपास २०-२५ मिनिटांचा हा प्रवास एका बाजूला डोंगरावर चढत जाणारी वस्ती आणि दुसरीकडे दूर दूर जाणारा तळ्याचा काठ यामधून चालला होता. काळपट निळसर दिसणारं पाणी उन्हात चमकत होतं. मधूनच तोतोरा- पाणलव्हाळ्यांची शेवाळी हिरवी बेटे लागत होती. त्यांचे पाण्यावर डुलणारे पुंजके नयनमनोहर दिसत होते. दूरवर निळसर डोंगर धूसर दिसत होते. हळूहळू वस्ती मागे पडली व क्षितीजावर तपकिरी रंगाचे काहीतरी तरंगताना दिसू लागले.






जसजसे ते जवळ आले तसतसे तरंगणारी बेटे, त्यावरील झोपड्या, वॉचटॉवर, कमानी, बोटी स्पष्ट होऊ लागले. कॅमेऱ्यांची भिंगे पुढे मागे करून सर्वजण ती दृश्ये अधाशासारखी टिपत होते. बघता बघता बोट दोन बेटांच्यामधून पुढे जात एका बेटाच्या किनाऱ्याला लागली.

“हीच ती जगप्रसिध्द उरोस बेटे बरं का” गव्हाळी रंगाचा, मध्यम बांध्याचा, उमदा, चुणचुणीत वाटाड्या आम्हाला माहिति पुरवत होता.


BIENVENIDOS
A LAS ISLAS FLOTANTES
LOS UROS
KAMISARAKI

इंग्रजी भाषेचा फारसा प्रसार नसूनही वाटाड्याचे इंग्रजी उच्चार स्वच्छ व खूपच छान होते. मदतीचा हात देण्यातही तो तितकाच तत्पर होता.

आमची बोट तरंगत्या बेटाच्या म्हणजे खेड्याच्या किनाऱ्याला लागताच उतरण्यासाठी आमची एकच लगबग सुरू झाली. वाटाड्याने आम्हाला आवरले म्हणून बरे. तो प्रथम उतरला व त्या तरंगत्या जमिनीवर उतरताच भसकन त्याचा पाय ३-४ इंच जमिनीत रुतलाच की! आम्ही तर त्याच्या पेक्षा खूपच वजनदार! काय झाले असते आमचे या भीतीने "पहिले आप पहिले आप" चे नाटक आपसात सुरू झाले. वाटाड्याने व नावाड्याने आम्हाला सावकाशपणे त्या बेटांवर उतरवले. आमचेही पाय खोलात जातच होते पण कसेबसे तोल सांभाळत होतो. जमीन नव्हतीच ती. वाळलेल्या 'तोतोरा' गवताचे भारे एकावर एक रचून व पसरून तयार झालेली पाण्यावरची चटई होती ती. त्यामुळे पाय रुतत होते व गवत तुटण्याचा आवाजही येत होता. आमच्या स्वागताला हसतमुखाने उभे होते – त्या गावचा 'प्रेसिडेंट' (प्रमुख), त्याची बायको व परिवारातील इतर सदस्य!



मध्ये मोकळी जागा व कडेने झोपड्या अशी या खेड्यांची रचना आहे. बोटीतून उतरून तोल सांभाळत आम्ही मोकळ्या जागेत येताच उपस्थित उरोसवासियांनी आमचे स्वागत गाणी म्हणून, नाच करून आम्हाला शुभेच्छा देऊन केले. त्यांच्या प्रमुखाने खेड्याची, कुटुंबाची, लेक टिटिकाकची माहिती तर दिलीच पण त्यांचे गवताच्या चटयांचे बेड कसे बनवतात, विणकाम, भरतकाम, करमणूकीचे कार्यक्रमही दाखवले. आम्हा सर्वांना आपल्या झोपड्या आतून दाखवल्या. काही लोकांना तर त्यांचे कपडे घालून मि. व मिसेस प्रेसिडेन्ट म्हणून फोटोही काढायला लावले. गवताची जमीन असल्याने ‘हे लोक स्वयंपाक कसा करतात’ हा प्रश्न आमच्या मनात इथे पाऊल टाकल्यापासून डोकावत होताच. कसे विचारावे याचा विचार मनात येण्या अगोदर आमच्या चेहऱ्यावर उमटला असावा. शिवाय त्या लोकांनाही आता प्रवाशांच्या कुतुहलाची सवय झाली आहेच. त्यामुळे त्यांच्या प्रेसिडेंटने खूण करताच दोन महिला पुढे सरसावल्या. त्यांनी मोकळ्या जागेच्या एका बाजूला गवताच्या जमिनीवर एक फुटभर उंचीच्या दगडांच्या भक्कम दोन उतरंडी रचल्या, त्यावर जाड पत्रा टाकून चुली मांडल्या व त्यावर सिरॅमिकची भांडी ठेऊन स्वयंपाकाचे प्रात्यक्षिक दाखवले.

“तुम्ही काय खाता” या प्रश्नाचे उत्तर लगेच “आम्ही तळयात मिळणारे मासे, बदके, बटाटे व पुनोहून कधीमधी आणला जाणारा तांदूळ शिजवून खातो” असे मिळाले.

“तुमचे बाथरूम कसे असते?” न रहाऊन आमच्यापैकी एकाने विचारले.

“आमच्या नित्यनैमित्तिक गरजा भागवण्यापुरता गवताच्या चटयांचा आडोसा बेटाच्या मागच्या बाजूला तळयाच्या काठावर उभारून आम्ही बाथरूम तयार करतो. चला. तुम्हाला दाखवतो” असे म्हणून आम्हाला वाटाड्याने खालच्या गवताच्या जाड चटईवर पुढच्याबाजूने थोडासा उंच व पाण्याच्या बाजूने उतरता होत जाणारा जाड पत्रा टाकून केलेल्या बाथरूम दाखवून आमचे पुढचे कुतुहलही ओळखले.

“या पत्र्याच्या उतारामुळे पाणी व इतर गोष्टी खालच्या गवतावर न पाडता सरळ तळयात समर्पित होतात” या वाक्याने सर्वांच्या चेहेऱ्यावर एक हलकेसे स्मित पसरले.

“कुणाला ट्राय करायचे आहे का?” त्याने मिश्किलपणे विचारले. पुनो सोडून जवळपास २-३ तास झाले होते. त्यामुळे तशी गरज वाटत होतीच तरीही ती तळयाच्या अगदी कडेवर पाण्यावर हेलखावे खाणारी पुढून

बंद पण तळ्याच्या बाजूने उघडी असणारी बाथरूम व त्यावरचा लटपटणारा पत्रा पाहून “नो नो” म्हणत सगळ्यांनी पळ काढला. वाटाड्याच्या चेहऱ्यावर हास्य पसरले. आमच्या मनात अजूनही प्रश्नांची मालिका तयार होतीच व त्यांच्याकडे उत्तरांची. मोकळ्या भागात या बेटाचे प्रेसिडेंट आमची वाटच पहात होते.

“या अशा बाथरूम मध्येच तुम्ही आंघोळही करता की काय?”

प्रेसिडेंट हसले व म्हणाले ”आम्हाला तुम्हा लोकांसारखी रोज अंघोळीची चैन करता येत नाही. कारण गवत कुजण्याचा धोका! म्हणून आम्ही महिन्यातून १-२ वेळा पुनोमध्ये सार्वजनिक स्वच्छतागृहात जाऊन आंघोळ उरकतो. इतक्या उंचीवरच्या कोरड्या व थंड हवेला इतकी स्वच्छता पुरते. त्याच वेळी आम्ही कपडे धुण्याचा कार्यक्रमही उरकतो. ”

“आजुबाजूला वाढणाऱ्या तोतोरा गवताचा बेड, चटया तयार करण्या पलिकडे दुसरे काही उपयोग आहेत का?”आमचे प्रश्न संपतच नव्हते.



“हो तर! ” प्रेसिडेंट साहेबांनी सांगायला सुरुवात केली. एक तोतोराचे गवत मुळापासून उपटून त्याच्या विविध भागांची माहिती ते देऊ लागले.

“ तोतोराचे गवत मुळापासून तोडले तर त्याचा खालचा वितभर उंचीचा भाग नारळाच्या आतल्या कोंबासारखा गोडसर, कुरकुरीत व पांढरा स्वच्छ असतो. खाण्यात उपयोगी येणारा हा भाग पोटाच्या तक्रारी व आयोडीनची कमतरता दूर करतो. थंडपणा हा याचा महत्वाचा गुण असल्याने तीव्र उन्हापासून आमचे रक्षण करणे व वेदनाशामक म्हणून प्रथमोपचारात भाग घेणे हेही या भागाचे काम. तोतोराच्या फुलांपासून बनवलेला चहा विरळ हवामानापासून आमचा बचावही करतो. इतकेच काय पण या गवताची मुळेही भक्कम आधार देण्याबरोबरच “वेस्ट मटेरीयल’शोषून घेऊन तळे स्वच्छ ठेवण्याचे काम पार पाडतात. अशी ही तोतोरा पाणलव्हाळी कल्पवृक्षाप्रमाणे आमच्या गरजा भागवायला सदेव सज्ज आहेत. ”

आम्हालाही त्यांनी तोतोराच्या मुळाचा छोटा छोटा तुकडा खायला दिला. प्रथम कोणीच तयार होईना. पण ह्यांनी ते धाडस केले. व त्यांच्याकडे पाहून मीही. खरंच, नारळाच्या कोंबाची गोडसर चव होती. “खूप

प्रमाणात खाल्ला तर तुमचे पोट बिघडू शकेल “ या प्रेसिडेंटच्या इशाऱ्यानंतर आणखी मागावेसे वाटत असूनही कोणीच ते धाडस केले नाही.

“ तुम्हाला निस्सानमधून जायचेय का मर्सिडिज मधून?”आता प्रश्न विचारण्याची पाळी प्रेसिडेंटची होती.

“मर्सिडीज नक्कीच आवडेल पण इथे पाण्यावर...?”

प्रेसिडेंटने हसून वाटाड्याला खूण केली व पाण्यावर तरंगत एक सुबक आकाराची १०-१२ माणसांना सामावून घेणारी आकर्षक लाल रंगाची होडी बेटाजवळ आली.

“हिच आमची मर्सिडीज. पलिकडे दिसते ती निस्सान” प्रेसिडेंटचे उत्तर. ते पुढे सांगायला लागले

”बोटीचा प्रवास हा तर आमच्या जीवनाचा अविभाज्य भाग. त्यासाठी याच तोतोरा गवताच्या घट्ट जुड्या एकमेकांना बांधून लहान मोठ्या होड्या केल्या जातात. ड्रॅगन, मासा, नाग, माकड यांचे आकार या होड्यांना देतात त्यामुळे त्या खूपच आकर्षक दिसतात. गंमत म्हणून आम्ही या होड्यांना निसान, मर्सिडीज,

बीएमडब्ल्यु वगैरे नावे देतो. मुलांनाही लहानपणापासून या होड्या बनवण्याचे व चालवण्याचे शिक्षण दिले जाते.

“मग या मुलांचे शिक्षण वगैरे?”

“एका त्यातल्या त्यात मोठ्या खेड्यात लहान मुलांची प्राथमिक शाळा आहे. अगदी छोटी छोटी मुलेही मजेत होड्या वल्हवत शाळेत जातात. त्यांचे प्राथमिक शिक्षण या शाळेत होते. पुढील शिक्षणासाठी मात्र पुनोशिवाय पर्याय नाही. ”

“आणि कोणी आजारी पडले तर त्याच्यावर उपचार...?”

“इथे जुजबी उपचार केले जातात पण मोठ्या दुखण्यासाठी पुनो गाठावे लागते” असे उत्तर दुसऱ्या बेटावरचा दवाखाना दाखवून प्रेसिडेंट्ने दिले.

“तसेच उजव्या हाताला पहा. ते आमचे चर्च”. प्रेसिडॅंटने छातीवर हात ठेवत सांगितले. आणखीही बरीच मनोरंजक माहिती मिळाली.



खरंच एका छोटेखानी बेटावर एक टुमदार गवती इमारतीच्या छपरावर क्रॉस मिरवत चर्चची इमारत दिमाखात उभी होती. हस्तकलेचे नमुने, मासे शहरात नेऊन विकणे हा जरी या लोकांचा परंपरागत उपजीविकेचा मार्ग असला तरी वाढत्या पर्यटन व्यवसायाचाही ते उत्तम फायदा घेतात. (येणाऱ्या प्रत्येक प्रवासी बोटीवर 'टोल' वसुली आहे. ) प्रवाशांची खातिरदारी करणे, त्यांना आपल्या वस्तु विकणे, आसपासच्या खेड्यातून त्यांना 'मर्सिडीज' मधून चक्कर मारून आणणे व त्या सर्वातून धनप्राप्ती करून घेणे या सर्व गोष्टी हे लोक अगदी कुशलतेने हाताळतात. बोलिव्हीयात तोतोराच्या चटया, हस्तकलेच्या वस्तु विकणे हाही यांचा एक उद्योग.

ही खेडी कितीही भक्कम असली तरी शेवटी ते गवतच. आणि तेही पाण्यात रहाणारं. त्यामुळे ते हळूहळू तळाशी कुजतंच. आपल्यासारख्या प्रवाशांच्या वाढत्या वर्दळीमुळे वरचा थरही तुटतो त्यामुळे त्यावर निदान महिन्यातून एकदातरी नवीन चटयांची भर टाकत रहाव लागतं. एवढी काळजी घेऊनही ३५-४० वर्षांनी ही खेडी तळयाचा तळ गाठतातच. त्यासाठी खेड्याला तीस वर्ष झाली की नवीन खेडं बांधायला सुरुवात

करतात. ते पुरेसे भक्कम झाले की या जुन्या खेड्यावरच्या चांगल्या झोपड्या, सामानसुमान, वॉचटॉवर वगैरे उचलून बोटीने नव्या खेड्यात नेतात.

अशी अंदाजे साठ-पासष्ट तरंगती खेडी आहेत म्हणे लेक टिटिकाकामध्ये. सगळी दहा ते बारा फूट खोल पाण्यात. तोतोरा गवत वाळवून त्याचे भारे उलट सुलट एकमेकावर पसरून व भक्कम लाकडांच्या व दोरीच्या साहाय्याने बांधून तयार केलेल्या सहा ते आठ फूट जाडीच्या चटया म्हणजे ही तरंगती खेड्याची जमीन. ही खेडी साधारण तीस ते तीनशे चौ. मीटरपर्यंत कोणत्याही आकाराची. त्यांचा आकार, त्यावरील घरे, माणसे या एकूणच वजनामुळे 'तरंगती' असली तरी खूपच सोसाट्याच्या वादळ वाऱ्याशिवाय "वाऱ्यावरती घेत लकेरी, दूर चालली उरोसची खेडी" असे होत नाही पण थोडीशी तरी जागा बदलतेच. किती गंमत वाटत असेल ना! सकाळी इथे तर संध्याकाळी दुसरीकडे. प्रत्येक खेड्यात त्याच्या व कुटुंबाच्या आकारमानाप्रमाणे तीन-चार कुटुंबे रहातात. रहाण्याच्या झोपड्याही याच गवताच्या चटयांपासून केलेल्या असतात. त्यांची कुटुंबसंस्था भावाभावात भांडणे होईपर्यंत अगदी घट्ट व एकसंध असते. पण पटेनासे झाले की भल्या मोठ्या

करवतीने तरंगती जमीन कापून मंडळी वेगळी होतात. कधीकाळी एकी झाली तर परत जवळ येऊन दोरीच्या सहाय्याने एकमेकांना बांधून व परत गवताचे थर रचून झाले की परत भाऊभाऊ एक.

मुळात चार एकशे वर्षांपूर्वी स्पॅनिश लोकांच्या हल्ल्यापासून बचाव करण्यासाठी 'इंकापूर्व' लोकांनी तलावाच्या पाण्यात तरंगती घरे बांधून अशा तऱ्हेने आश्रय घेतलेला असल्याने 'वॉच टॉवर' तर हवाच! पूर्वीची दोन-तीन हजार कुटुंबाची संख्या आता पाच सहाशे कुटुंबापर्यंत आली आहे, कारण उच्च शिक्षण व रोजगाराच्या शोधात बरेच उरोसवासी पुनो, बोलिव्हीया व इतरत्र रहातात. मात्र कुठेही असले तरी हे सगळे आपल्या इंकापूर्व संस्कृतीशी एकनिष्ठ आहेत. कुटुंबातील मोठ्या माणसांनी ठरवून केलेली विवाहपध्दत, पोषाख, रहाणी यातून त्याच्या संस्कृतीची कल्पना येते. पुरूष शर्ट, पॅंट, जाकीट, हॅट या पोशाखात तर स्त्रिया स्कर्ट, ब्लाऊज, जाकीट, हॅट या वेशात असतात. आयमारा ही त्यांची सध्याची प्रचलित भाषा. इंग्रजीही कामचलाऊ येते पण सहसा बोलत नाहीत. प्रचंड सोसाट्याचा वारा, थंडी, प्रखर ऊन यापासून रक्षण व्हावे म्हणून कपड्यांचे एकावर एक थर घालण्याची पद्धत आहे. बायकांच्या घट्ट घातलेल्या २ वेण्या व टोकाला लग्न व्हायचे असेल तर रंगीत व झाले असेल तर काळे झुपकेदार गोंडे आपले लक्ष वेधून घेतात. गवतावरूनच

दिवसरात्र ये जा असल्याने पायात बूट आवश्यकच. पाय फाकवून दोन्ही पायांवर भार देत डुलत डुलत चालण्याची उरोसच्या लोकांची पद्धत पेंग्वीनची आठवण करून देत होती. आमचेही थोड्याच वेळात आपोआप पेंग्वीन झाले. काही प्रगत व त्यातल्या त्यात श्रीमंत खेड्यात सोलार पॅनल्स बसवून वीज, रेडिओ वगैरे सोयी केलेल्या दिसल्या.

ही सगळी माहिती गोळा करताकरता वेळ कसा गेला कळलेच नाही. मर्सिडीजची परत एक मस्त चक्कर मारण्याचा मोह आम्हाला आवरता आला नाही. भाषा समजत नसतानाही आमच्याशी संवाद साधण्याची त्या साध्यासुध्या खेडुतांची धडपड पाहून उरोसची ही तरंगती वस्ती पहायला पुनोपर्यंत आल्याचं सार्थक झाले. येताना या आश्चर्याची काहिच माहिती नसल्याने येववत नव्हतं, पण जाताना मात्र प्रेमळ आदरातिथ्यामुळे जाववत नव्हतं. परतताना आम्हाला एकेकाने हातात हात घेऊन न कळणाऱ्या भाषेतून “परत या बर का” म्हणुन दिलेला निरोप भाषेच्या माध्यमाविना अचुक हृदयाला भिडला. बोटीने वेग घेतला, पुनो दूरवर दिसू लागल. आम्ही मात्र परत परत मागे वळून एक आगळंवेगळं अद्भुत डोळयात साठवत होतो. नकळत ते आमच्या मनात खोलवर घर करत होतं.

(पुर्वप्रसिद्धी: 'मेनका जुलै २०१३')



# मानवनिर्मित एक अद्भुत :

## तिबेट अफलातून स्कायट्रेन!



२००५ साली ‘तिचे’ वर्णन वृत्तपत्रात रकानेच्या रकाने भरून आलेले वाचल्यापासून `तिच्या’ बद्दलचं कुतूहल मनात जागृत झालेलं होतं आणि १ जुलै २००६ला `ती’ सर्वांसाठी खुली झाल्याने त्यातून प्रवास करण्याची इच्छा बळावली. सुरुवातीच्या ` तिच्या’ दिसण्याची, उपयुक्ततेची, कार्यक्षमतेबद्दलची बरीच वर्णन वर्तमान पत्रातून वाचण्यात येऊ लागली. पण काही दिवसाच्या या नवलाईनंतर ‘तिच्या’ स्टॅबिलिटी व भवितव्याबद्दल उलटसुलट भाकितं येऊं लागली. बर्फ वितळणे, अस्थिर भूस्तर, त्यामुळे ‘तिचा’ प्रवासाचा मार्ग खचणे वगैरे शक्यता जशा चर्चिल्या जायला लागल्या, तशी जमेल तेवढ्या लवकर तिथे गेलं पाहिजे ही इच्छा पराकोटीला पोहोचली आणि २००७ च्या ऑगस्टमध्ये हा योग जुळून आला. एव्हाना हे सगळे कशाबद्दल चाललं आहे हे तुमच्या लक्षात आले असेलच. ‘ती’ म्हणजे चीन व तिबेट यांना जोडणारी ‘चिंघाई-तिबेट ट्रेन‘स्काय ट्रेन’—’बिजींग ल्हासा एक्स्प्रेस’-- ‘जगाच्या छपरावरून धावणारे रॉकेट’ अशा वेगवेगळ्या नावांनी ओळखल्या जाणारी ही जगातील सर्वात उंचावरून धावणारी ‘आगगाडी’ म्हणजे मानवनिर्मित अदभूतच आहे.

तिबेटमधील भौगोलिक स्थिती फार वेगळी आहे. हिमालयाच्या उंच उंच पर्वतांनी तिबेटला जगापासून खूपच दूर ठेवलं आहे. समुद्रसपाटीपासून ११८०० फूट उंचीवर असलेल्या तिबेटची राजधानी ल्हासाला जायला पूर्वी फक्त विमान किंवा रस्ता - तोही डोंगरातून, वाळवंटातून, प्रचंड चढ उतारांचा- एवढाच पर्याय होता. त्यामुळे तिथे पोहोचणे खूपच अवघड व वेळखाऊ होतं. त्यातच समुद्रसपाटीपासून असलेल्या उंचीमुळे प्राणवायूची कमतरता, कमी तपमान, बर्फ, पाऊस या सर्व लहरी हवामानामुळे पीकपाणीही बेताचंच, शहरी सुधारणांचा अभाव, धर्माचा पगडा यामुळे गेल्या काही वर्षांपर्यंत तिबेटमध्ये कामाव्यतिरिक्त कुणाला सहजासहजी प्रवेश मिळत नव्हता. पूर्वी चीनहून तेथे जाण्यासाठी जुन्या सिल्करोडचा एकमेव पर्याय होता. त्यानंतर चिंघाई हायवे सुरू झाला. साधारणपणे चीन मधून व्यापारासाठी व तिबेटमधली परिस्थिती ताब्यात ठेवण्यासाठी माणसांची, सैन्याची ये-जा ट्रकमधून व्हायची. त्या हायवे वरून सुद्धा अत्यंत विरळ हवामानात हिमालयाच्या १४००० फुटांपेक्षा जास्तीच्या उंचीच्या पर्वतांमुळे हे दळणवळण खूपच कठीण होते. चीनने ह्या रेल्वेमार्गाची निर्मिती केली त्यामुळे आता तिथे जाणे बरेच सुकर झाले आहे. चीन व ‘जगाचे छप्पर’ असे ज्याचे वर्णन केले जाते तो तिबेट यांना जोडणारी ही गाडी म्हणजे स्थापत्य शास्त्रातील एक आश्चर्यच आहे.


जगातील सर्वात उंचावरून धावणारा रेल्वेमार्ग, त्याच्या बांधकामाला लागलेले (त्यामानाने) कमी दिवस, जगातील सर्वाधिक उंचीवर बांधलेले रेल्वेस्टेशन, या मार्गासाठी खोदलेला सर्वाधिक उंचीवरचा बोगदा असे अनेक विक्रम या रेल्वेमुळे नोंदवले गेले आहेत. अशा या बहुचर्चित गाडीमध्ये बसण्यासाठी आम्ही उत्सुक होतो. पण त्यासाठी आम्हाला बिजींग किंवा ल्हासाला जाणे आवश्यक होते. आम्ही ल्हासाला जाण्याचा पर्याय घेतला.



आम्ही चीनमधल्या चेंगडू या गावाहून ल्हासाचं विमान पकडलं. दोन-तीन हजार फुट उंचीवरून आम्ही एकदम बारा हजार फुटांवर पोहोचणार होतो. त्यामुळे बऱ्याच पुस्तकातून वाचलेल्या व सिंगापूरपासून गाईडने दिलेल्या 'हाय अल्टिट्यूड' मध्ये कसे वागावे, कसे चालावे, काय खावे या बद्दलच्या सूचना प्रवासभर आठवत होत्या व विनाकारणच पोटात गोळा आणत होत्या. बघताबघता विमान जमिनीला टेकले आणि धडधडत्या म्हणजे'हाय अल्टीट्युडच्या" परिणामामुळे खरोखरच्याच धडधडत्या हृदयाने आम्ही ल्हासात पाउल टाकले. पण सुदैवाने थोडेसे गरगरणे सोडले तर इतर कोणताही त्रास न होता आम्ही इमिग्रेशनमधून बाहेर आलो. आमच्या गाईडने बोलावलेले २ स्थानिक गाईड त्यांच्या आणखी २ सहकाऱ्यांसह आमची वाटच पहात होते. आम्ही बाहेर येताच आमच्या गळयात रॉ सिल्कचा स्कार्फ घालून त्यांनी मोठ्या आनंदाने आमचे स्वागत केले. ल्हासाची माहिती ऐकत व ब्रह्मपुत्रेचे पहिले दर्शन घेत आम्ही हॉटेलवर पोहोचलो. हॉटेल खूपच छान, ४ तारांकित होते. बाजूने डोंगर दिसत होते. हॉटेलवर जाताच खोल्या ताब्यात घेतल्या आणि बॅग उघडली तर गाईडने वा कोणत्याही माहिती पुस्तकात न सांगितलेली एक गंमत अनुभवली.

# ल्हासा विमानतळ व ब्रह्मपुत्रा नदी








ल्हासा विमानतळ व ब्रह्मपुत्रा नदी

आमच्याजवळच्या जेवढ्या सीलबंद पिशव्या होत्या त्या सगळ्या ‘टम्म’ फुगल्या होत्या. ‘हाय अल्टीट्यूडचा’ गंमतशीर परिणाम! रात्री जेवताना सगळ्या सहप्रवाशांच्या गप्पांचा ओघ त्या पिशव्यांकडेच वरचेवर वळत होता. हॉटेलमध्ये ऑक्सिजनची कमतरता दूर करण्याची पूर्ण तयारी होती. प्रत्येक खोलीत पोर्टेबल कूलरसारखी ऑक्सिजनचा पुरवठा करणारी यंत्रे बसवली होती. आपण फक्त आवश्यक रकमेचे कार्ड विकत घेऊन त्यात सरकवायचे की रात्रभर पुरेल इतका ऑक्सिजनचा पुरवठा होणार. याशिवाय स्वागतकक्षाजवळच इमर्जन्सी सेवा पुरवणाऱ्या दोन नर्सिंग रूमही डॉक्टर्ससह तयार होत्या. आमच्यापैकी एकीला ऑक्सिजनच्या कमतरतेचा खूप त्रास झाला तेव्हां त्या सर्व सोईंचे महत्व कळाले. हॉटेलबाहेर फिरण्याच्या बसमध्येही ऑक्सिजनने भरलेल्या उश्या व नळकांडी सज्ज ठेवलेली होती. या सगळ्याचे खूपच कौतुक वाटले. तिबेटची राजधानी ल्हासा उंच उंच डोंगराच्या कुशीत वसलेलं छोटसं गाव. पण टुमदार घरे, मोठमोठ्या मॉनेस्ट्री, जमेल तिथे बांधलेल्या, वाऱ्यावर डुलणाऱ्या रंगीबेरंगी पताका यांनी नटलेलं ल्हासा खूपच छान दिसत होतं. पूर्वीचं ल्हासाचं साधंसुधं रूप आता या रेल्वेमुळे होणाऱ्या आर्थिक प्रगतीमुळे, त्यामुळे येणाऱ्या सुधारणांमुळे बदलू लागलेलं जाणवत होतं.









दलाई लामांचा पोताला पॅलेस



अनामिका बोरकर

जोखांग मॉनेस्ट्री



बेताच्या चणीचे, चपट्या नाकाचे, मूळचे गौरवर्णीय पण हवामानामुळे लालसर, ताणलेल्या कातडीचे हसतमुख, प्रामाणिक रहिवासी एकतर सदैव कामात गर्क तरी असतात नाहीतर हातातील चक्र फिरवत तोंडाने प्रार्थना तरी पुटपुटत असतात. पण आता येणाऱ्या प्रवाश्यांचे स्वागतही ते तितक्याच प्रसन्नतेने करू लागलेत. वेगवेगळ्या देशातून येणाऱ्या प्रवाशांच्या वेगवेगळ्या भाषा, संस्कृती, रहाणीमान याच्याशी जुळवून घेण्याचा प्रयत्न करतानासुद्धा ल्हासाचे रहिवासी स्वतःची खास अशी ‘तिबेटी’ ओळखही सांभाळून ठेवण्यात यशस्वी झाले आहेत यात शंका नाही. दुथडीभरून वहाणारी ब्रह्मपुत्रा हे तिबेटचे मोठे वैभव आहे. त्याच्यामुळे बार्ली, गहू, थोड्या प्रमाणात का होईना बटाटे, मका यांसारखी पिके हीच ह्यांची शेती. बार्लीतर इथल्या लोकांचे मुख्य धान्य. बार्लीचे पीठ याकच्या तुपात भाजून याकच्याच दुधात शिजवलेला’त्सांपा’ हा तिबेटी लोकांचा आवडता खाद्यपदार्थ. इथल्या हवामानात, मुख्यतः विरळ वातावरणात हमखास होणाऱ्या युरीन प्रॉब्लेमसाठी बार्लीचा उपयोग औषधासारखा होतो ही माहितीही नव्यानेच समजली. आता ‘हरितगृहां’ (ग्रीनहाउस)मधून हळूहळू इतर भाजीपालाही पिकवण्याचे प्रयत्न सुरू झालेले दिसत होते. प्रमुख रस्त्यांवर व चौकातून मस्त फुले फुलली होती. हवेत गारठा नव्हता पण उकाडाही नव्हता. मधूनच येणारी पावसाची भुरभुर वातावरणात

प्रसन्नता आणत होती. ८-१० दिवसात ल्हासा, पोताला पॅलेस, आजुबाजूची कांही ठिकाणे पाहून झाल्यावर आम्ही आमचा मोर्चा मुख्य लक्ष्याकडे म्हणजेच रेल्वेच्या प्रवासाकडे वळवला.






ल्हासा रेल्वे स्टेशन गावाच्या बाहेर अगदी साधंसुधं, डोंगराच्या पायथ्याशी आहे. आम्ही तिथे पोहोचलो तेंव्हा पावसाची भुरभुर चालूच होती. त्यामुळे स्टेशनची इमारत एकदम स्वच्छ, चकचकीत दिसत होती. आतला परिसर माणसांनी गजबजलेला होता. दोन पायऱ्या चढून गेल्यावर प्रथम नजरेत भरला तो गाड्यांच्या वेळा दाखवणारा भला मोठा बोर्ड. तो इंग्रजीत असल्याने वाचता आला. बाजूला दोन तीन छोट्या खोल्या सोडल्या तर बघण्यासारखे फारसे काही नव्हते. आतला प्लॅटफॉर्म बघण्याची उत्सुकता लागली होती. पण गाडीची वेळ होईपर्यंत तिथे प्रवेश नव्हता. हळूहळू. गर्दी वाढायला लागली. तसे कुठूनसे रेल्वेचे ४-५ अधिकारी आतल्या बाजूने अवतरले व त्यांनी प्लॅटफॉर्मवर जाण्याची वेळ जवळ येताच स्टेशनमधली चार गेटस उघडली. ‘चला, आता तिकीट दाखवून आत गेलो की गाडीत बसायला मोकळे’असा विचार मनात डोकावायला लागला. तिकीट व पासपोर्टची तपासणी अगदी बारकाईने होऊ लागली. ल्हासा सोडण्यापूर्वी प्लॅटफॉर्मवर प्रवेश करण्यापूर्वीच आपल्याला आपल्या प्रकृतीविषयी सर्व तपशील स्टेशनवरच्या अधिकाऱ्याला द्यावा लागतो. गाडीचा वापर सुरू झाल्यापासून विरळ हवामानामुळे २-३ मृत्यू घडून आलेले असल्याने आता जरा जास्तच काळजी घेतली जाते. पासपोर्ट, सिक्यूरिटी, तिकीट, आरोग्याविषयीचे प्रकटन

यांची सांगोपांग तपासणी झाल्यावर आम्हाला फलाटावर प्रवेश मिळाला. बॉटलग्रीन रंगाची पिवळे पट्टे असणारी व गडद लाल रंगाची पिवळे पट्टे असणारी अशा दोन प्रकारच्या़ा गाड्या फलाटांवर उभ्या होत्या. त्यापैकी टी २८ या गाडीने आम्ही बीजिंगपर्यंत न जाता गोलमुडला उतरणार होतो. गाडीला प्रत्येकी ९४ सीटस असलेले काही डबे, १-२ स्लीपर डबे, ३-४ सॉफ्ट कोचवाले व एक जेवणाचा असे अंदाजे १२ डबे होते.

बीजिंग ते ल्हासा या प्रवासाला ३६ तास लागतात. त्यातील हिमालयाच्या कुशीतून काढलेला ल्हासा ते गोलमुड हा अप्रतिम सौंदर्याने नटलेला ११४२ किमी चा टप्पा आम्ही निवडला होता. यासाठी लागणारा वेळ होता चौदा तास. प्रवासात वेळ घालवण्यासाठी कुणी पुस्तक आणले होते, तर कुणी झोप काढण्याच्या विचारात होते. प्रत्यक्षात यातले काहीच केले गेले नाही. जमेल तेवढे फोटो काढणे व जास्तीत जास्त वेळ बाहेरचे दृश्य डोळ्यात साठवणे एवढेच १४ तासात केले गेले.

रेल्वेचा बिजींग ते गोलमुड हा भाग बराच अगोदर बांधून तयार होता पण गोलमुड ते ल्हासा तयार होईपर्यंत तिबेट जगापासून दूरच होता. या मार्गामधला खरा अडसर होता तो या भागातला ८०% पर्माफ्रॉस्ट एरिया. पृष्ठभागावरच्या बर्फमिश्रित वाळूमुळे ठिसूळ होणारा व त्याखाली सदैव घट्ट बर्फाचे थर असणारा हा भाग पुलाचा भार, गाडीचा वेग, त्यामुळे निर्माण होणारी उष्णता कशी पेलेल हे खरं मुख्य आव्हान होते. पण इंजिनियरिंग क्षेत्राला असलेलं आव्हान पेलून वीस हजार कामगारांच्या मदतीने सहाशे कोटी डॉलर्स खर्च करून चीनने अवघ्या ४ वर्षात हा चमत्कार केला व तिबेट जगाशी जोडलं गेलं. ‘या गाडीमुळे होणारा आर्थिक लाभ कोणाला होणार? तिबेटची त्यामुळे भरभराट होईल का?’ यावर प्रवाशात जोरजोरात चर्चा चालू होती. याची उत्तरे मिळायला कांही वर्षे जावी लागतील हे नक्की पण सर्वसामान्य प्रवाशांची व हौशी पर्यटकांची सोय छान झाली हे मात्र खरे. पूर्वी वापरात असणारा एकमेव वहातुकीचा मार्ग ह्या गाडीमार्गाच्या जवळून धावतो. कधी उजवीकडून तर कधी डोंगराच्या कुशीतून तो रस्ता एखाद्या लहान मुलाच्या कुतुहलाने धावणाऱ्या गाडीकडे पहात असतो. कुनलून व तंगुला यांच्यासारख्या प्रचंड मोठ्या डोंगरांच्या अंगाखांद्यावर हा दुपदरी रस्ता एखाद्या रेघेसारखा नाजूक दिसतो. अन ही रेल्वे कधी डोंगराच्या पोटात शिरून, कधी दोन

डोंगराच्या धळीतून तर कधी या डोंगरांतून वहाणाऱ्या पाण्यामुळे झालेल्या विस्तीर्ण पात्रावरून आपल्याच डौलात एखाद्या नागिणीप्रमाणे मस्त सळसळत जाते.

या टूर मध्ये स्लीपर किंवा सॉफ्ट कोच समाविष्ट नव्हते. त्यामुळे गाडीत बसण्याआधीच ‘हार्डकोच किती हार्ड असतील? एवढा लांबचा प्रवास नुसता बसून कसा काय करू शकू?’ हे प्रश्न सर्वांचा चेहऱ्यावर स्पष्ट वाचता येत होते. कुणालाही उत्तरे न देता गाईड मंडळींनी प्रथम आमचे सामान डब्यामध्ये नीट लावणे, आम्हाला आपापल्या जागांवर स्थानापन्न करणे वगैरे कामे मार्गी लावली. आणि ’काय?’ अशा अर्थाने आमच्याकडे पाहून भुवया उंचावल्या. पण आमचे प्रश्न ओठातच अडकले होते. तथाकथित ‘हार्डकोच’ पाहूनच आम्ही थक्क झालो होतो. निळया रंगाचे नीटनेटके अभ्रे घातलेले जाड कुशन्स असणारे प्रशस्त कोच पाठीवरच्या केशरी रूमालांमुळे खूपच शोभिवंत दिसत होते. डब्याच्या दोन्ही बाजूंना स्वच्छ प्रशस्त खिडक्या बाहेरची शोभा पूर्णपणे दाखवत होत्या. त्या खिडक्यांना काटकोनात ३-३ जणांची बसण्याची सोय होईल असे २ बाक समोरासमोर तोंडे करून बसवलेले होते. जेणेकरून आपण आपल्या सहप्रवाशांशी व्यवस्थित गप्पा मारू शकू.







वरच्या दोन्ही बाजूंना सामान ठेवण्यासाठी बर्थ होते. दोन बाकांच्या मध्ये छोटेसे सर्व्हिंग टेबल होते ते पाहून, आपण चुकून वरच्या वर्गाच्या डब्यात तर शिरलो नाही अशी शंका मनात आली.

सकाळी बरोबर ८वा. गाडीने ल्हासा सोडले व ती गोलमुडच्या दिशेने निघाली. आमच्या नजरा आपोआप खिडकीकडे वळल्या. सकाळची वेळ होती, कोवळी उन्हे आजूबाजूच्या घरांवर, बागांवर पसरली होती. जरी या रेल्वेचे धावणे हे रोजचेच होते तरी रेल्वेमार्गाच्या जवळच्या भागातील मुले माणसे हात हलवून हसऱ्या चेहऱ्याने आम्हाला निरोप देत होती. डिझेल इंजिन लावलेली ही गाडी छोटीमोठी गावे- गावे कसली, छोट्या छोट्या वाड्या- मागे टाकत ‘नाग्कू’ (Nagqu) स्टेशनकडे धावत होती. या मार्गावर लागलेला पहिलाच बोगदा ‘यांग बा जिंग’हा सर्वात जास्त म्हणजे ३३४५ मी. लांब व समुद्रसपाटीपासून ४२६४ मी उंचीवर होता. हे पाहून आता या गाडीच्या जागतिक विक्रमांना सुरुवात झाली याची खात्री पटली. एक दीड तासात नाग्कू स्टेशनावर गाडी थांबली. प्रवाशांची काही फारशी चढउतार झालेली दिसली नाही. पण गाडीला पाठीमागून आणखी २ डिझेल इंजिने जोडण्यासाठी हा मुक्काम होता हे नंतर समजले. ल्हासा १२००० फूट उंचीवर आहे. गाडीला यापुढचा तीन-चार हजार फुटांचा चढ चढायचा होता. त्यासाठी ही जादा कुमक

आवश्यक होती. नाग्कूनंतर मात्र गाडी जी सुसाट निघाली ती एकदम १२ तासांनी गोलमुड आल्यावरच थांबली. गाडीने स्टेशन सोडले आणि आमचं लक्ष डब्यात वळलं.


प्रत्येक सर्व्हिंग टेबलावर एक सुमारे २५ सें. मी. व्यासाची स्टेनलेस स्टीलची चकचकीत थाळी ठेवलेली पाहून ‘हे कशासाठी? ६ प्रवाशांसाठी एकच थाळी कशी?’ हे प्रश्न मनात डोकावण्याआधीच गाईडने त्यात ‘कचरा टाकायचा आहे’ या माहितीची भर टाकली. लगेच ‘एवढ्या छोट्याश्या थाळीत किती कचरा मावणार? राहिलेल्या कचऱ्याचे काय?’ हे प्रश्न अपरिहार्यच होते. पण जेव्हा दर दोन तासांनी कचरा गोळा करणारी छोटी ट्रॉली डब्यात फिरायला लागली तेव्हा आपण सिंगापूरमध्ये असल्याचा भास व्हायला लागला. हे कमी होते म्हणून की काय दर चार तासांनी गणवेशधारी सेवक हातात झाडू घेऊन एक कणही कचरा बाकांखाली न लोटता सगळा हातातल्या पिशवीत गोळा करीत हिंडू लागला तेंव्हा आश्चर्याने दाही बोटे तोंडात जायची बाकी राहिली. स्टेशन सोडल्यावर दारे घट्ट बंद झाली, खिडक्या मुळातच बंद, त्यामुळे ‘खाल्ले की खिडकीतून बाहेर भुर्र्र...’ हा खेळ नाही. इतकेच काय पण टॉयलेटचे वेस्ट, पाणीही

डब्याखालील बंद पेटीत साठवून पुढच्या मुक्कामालाच रिकामे केले जाते. ही रेल्वे बांधताना चीन सरकारने जे पर्यावरणाचे रक्षण करण्याचे ठरवले होते त्यासाठी ही सर्व काळजी घेतली जाते.

गाडी डोंगराच्या कुशीत शिरताच गाडीतलं लक्ष परत खिडकीबाहेरच्या दृश्याकडे गेलं. एखादा सिनेमाचा पट उलगडत जावा तसे एकामागोमाग एक डोंगर दिसायला लागले, जवळ जवळ यायला लागले, गाडीच्या दोन्ही बाजूंनी धावायला लागले. गाडी अंदाजे १०० कि. मी. पेक्षा जास्त वेगाने धावत होती. ल्हासा गाव, घरं, त्यातील रस्ते आजूबाजूला होते तोवर गाडीचा वेग जाणवत होता. पण गाडीपेक्षा मोठ्ठे डोंगर जवळ आल्यावर तो तेवढा जाणवेनासा झाला. पाहता पाहता गाडी लिउ वू (Liu Wu) बोगद्यात शिरली. त्यानंतर गाडीचा कधी बोगद्यात तर कधी डोंगराबाहेर असा सूर्याशी लपंडाव चालू झाला.




ALTITUDE



हळूहळू ऊन खिडकीतून डोकावत प्रवाशांना न्याहाळू लागलं. एवढ्या उंचीवर, विरळ हवेत सूर्याच्या अल्ट्रा व्हायोलेट किरणांचाही बराच त्रास होतो असं कुणाला तरी आठवलं आणि आमच्यातल्या हौशी मंडळींनी गॉगल्स काढले. पण खिडकीच्या काचाही यूव्ही प्रोटेक्टेड आहेत अशी माहिती लगेच कुणीतरी पुरवली. गाडीची नागमोडी वळणेही चालूच होती. त्यामुळे तसा उन्हाचा त्रास अजिबात जाणवत नव्हता. पण समजा व्हायला लागलाच तर खिडक्या'पडदानशीन' करायला सुरेख स्वच्छ जाड पडदे खिडकीच्या दोन्ही बाजूंना रूळत होते.

आम्ही बाहेर पहाण्यात मग्न होतो तोच गाईडने आमचे लक्ष गाडीतील खास सोयींकडे वळवले. गाडी १५-१६ हजार फुटांपेक्षा जास्त उंचावरून जाणार असल्याने, ह्या गाडीसाठी अंदाजे ८-९ हजार फुटांवर असावे तितपत प्रेशर असणारे, पुरेसा प्राणवायु खेळता ठेवण्याजोगे खास डबे तयार करून घेतले आहेत. त्यासाठी डब्याच्या तळातून जाड नळयांद्वारे पुरेसा प्राणवायू डब्यात पुरवला जातो. या खेरीज जर कोणाला जादा प्राणवायूची आवश्यकता भासलीच तर प्रत्येक सीटसाठी (बाकाखाली) ऑक्सिजन कनेक्टर असतो. त्याच्या वापरासाठी आवश्यक पाईप घेऊन एक अधिकारी सतत गाडीत चकरा मारत होता.






गाडीतील तपमानही आवश्यकतेनुसार योग्य राखलेले होते. या सर्वांमुळे आपण उंचावरून प्रवास करत आहोत हे जाणवत नाही. प्रत्येक डब्यात भारतीय पद्धतीची २-२ स्वच्छतागृहे व ३-३ बेसिन होती. गरम पाण्याचा पुरवठा अगदी उन्हाळ्यात सुद्धा सतत चालू होता याचे खूप कौतुक वाटले. ह्या सर्व सोयींच्या व त्यांच्या वापराबद्दलच्या सूचना ३ भाषांमध्ये स्पष्ट लिहिलेल्या होत्या. शिवाय माहिती सतत डिस्प्लेवरही दाखवली जात होती. जेवणाच्या बोगीमध्ये आम्हाला २ भाज्या, सूप व भात असे शाकाहारी जेवणसुद्धा मिळू शकल्याने आणखी मजा आली.

दऱ्या, डोंगर पार करत, वळणे घेत, कधी बोगद्यातून तर कधी पुलावरून गाडी सुसाट धावत होती. काही ठिकाणचे पूल तर एवढे लांबलचक होते की पुलाचा बराचसा भाग गाडीत बसूनही दृष्टीक्षेपात येत होता. डोंगरावरून वाहणाऱ्या पाण्याने अनेक ठिकाणी मोठमोठ्या घळी किंवा सपाट जागा निर्माण झाल्या आहेत. पुलाखाली चरणारे याकचे कळप पुलाखालच्या तुरळक गवतात गाडीकडे पहात निर्भयपणे चरत होते. कदाचित ऑगस्टमध्ये तिबेटमध्ये उन्हाळा असल्याने असेल पण माझ्या कल्पनेतल्या ‘हिमालय म्हणजे बर्फाचा डोंगर’ ह्या चित्राच्या अगदी उलट आजुबाजूला दिसत होतं. दूरवर कुठेही बर्फाचा मागमूसही नव्हता.

नुसते मोकळे डोंगर! ना झाडं, ना गवत! नाही म्हणायला खुरटी झुडुपं क्वचित कुठे कुठे दिसायची. बाकी सगळीकडे फक्त दगड — आडवे उभे, मोठेछोटे, चपटेगोल, लाल, पांढरे, पिवळे, काळे, तपकिरी, हिरवे दगडच दगड. कधी ते एकमेकांवर आडवे रचलेले दिसायचे तर कधी शाळेतल्या मुलांप्रमाणे शिस्तीत एकाशेजारी एक उभे. कधी फेर धरल्याप्रमाणे गोलाकार करून उभे. दगडांची ही चढण, उतरंड, घुसळण पाहून समुद्राच्या पोटातून वर येताना हिमालय किती नैसर्गिक प्रकोपातून गेला असेल याची कल्पना येते.

पहाता पहाता गाडी सुमारे चार हजार चौरस कि. मी. आकाराच्या 'तंग्रीला नोर' किंवा 'नाम त्सो' असं नाव धारण करणाऱ्या प्रचंड तळयाला वळसा घालू लागली. जवळजवळ २० मिनिटे गाडी या तळयाच्या कडेकडेने धावत होती. डोंगराची रांग तळयाच्या पार्श्वभूमीवर शोभत होती, स्वच्छ ऊन पाण्यावर चमकत होते आणि शांत, स्वच्छ, स्फटिकासारखं पारदर्शक असणारं तळयाचं पाणी आकाशाचा निळाशार रंग लेऊन आमचं स्वागत करत होतं. मान सरोवरासारखीच आणखी ३ तळी तिबेटमध्ये पवित्र मानली जातात. त्यापैकी हे एक. मानसरोवर पाहाण्याचा योग अजून यायचा आहे पण ते तळं, त्याची राखण करण्यासाठी सज्ज असणारा नाम त्सो पर्वत पाहून खूप प्रसन्न वाटलं हे खरं.



अनामिका बोरकर



यानंतर पर्वताच्या रांगामागून रांगा मागे टाकत गाडी जगातील सर्वात उंचीवरच्या फेंग हुओ शान (Fenghuoshan) या बोगद्यामध्ये शिरली. हा १३४० मीटर लांबीचा बोगदा समुद्रसपाटीपासून ४९०० मीटरपेक्षा जास्त उंचीवर आहे. ही सर्व माहिती प्रत्येक डब्यातील स्पीकर्समधून चिनी व इंग्रजीतून दिली जात होती. त्या नंतर लागलेल्या ऍमडो रेल्वे स्टेशनपासून २९ जून २००१ रोजी ल्हासाच्या व गुलमडच्या दिशेने दोन्ही दिशांना एकाचवेळी रेल्वे ट्रॅक बांधायला सुरूवात झाली होती ही माहितीही स्पीकरमधून मिळाली. ते स्टेशन बघेपर्यंत गाडी चढ चढायला लागल्याचे जाणवू लागले. ‘तंगुला खिंड’ जवळ येत आहे हे कळताच सगळे बाहेर बघू लागलो.

१६६४० फूट उंचीवर असणाऱ्या तंगुला खिंडीतला हा मार्ग जगातील, खिंडीतून जाणाऱ्या अनेक रेल्वेमार्गांपैकी सर्वाधिक उंचीवरून जाणारा मार्ग आहे. गाडी’तंगुला स्टेशन’ मध्ये शिरत असल्याची घोषणा झाली व सगळे खाली उतरायची तयारी करू लागले. तंगुला स्टेशन जगातील सर्वात जास्त म्हणजे १६६२७ फूट उंचीवर आहे. त्या गडबडीत चिनी भाषेतली माहिती सांगून संपली होती व इंग्रजीत स्पीकरवरून जोरजोरात सूचना देण्यात येत होती की, गतवर्षी प्रवाशांना विरळ हवेचा त्रास झाला असल्याने गाडी आता

इथे थांबत नाही, पण वेग मात्र खूपच कमी करते. थोडीशी निराशा झाली खरी, पण मोठमोठ्या खिडक्यांमुळे व गाडीच्या धीम्या गतीमुळे आपले काही तरी हुकले अशी हुरहुर मात्र वाटली नाही. तंगुला खिंड, तंगुला डोंगर व आसपासचा परिसर पाहून मन तृप्त झाले. अत्यंत विरळ प्राणवायू असणाऱ्या हवेत, समुद्रसपाटीपासून उंचावर, अत्यंत प्रतिकूल व अनियमित हवामान बदलांना तोंड देत हा रेल्वे मार्ग बांधणाऱ्या श्रमिकांचे कौतुक हा मार्ग प्रत्यक्ष बघितल्यावर प्रकर्षाने वाटले. प्राणवायूची कमतरता दूर करण्यासाठी या कामगारांना सतत सिलेंडरचे ओझे जवळ बाळगावे लागे हे ऐकल्यावर तर गाडीतून अलगद आरामात प्रवास करताना मनोमन कानकोंडे व्हायला झाले. त्या कामगारांना प्राणवायूचा तुटवडा पडू नये म्हणून चीन सरकारने प्राणवायू निर्माण करणाऱ्या डझनावारी फॅक्टरीज या मार्गाच्या जवळपास उभारलेल्या दिसत होत्या.

तंगुला डोंगर बघितल्यावर मग पुढचे डोंगर साहजिकच लहान वाटायला लागले. पण जे दृश्य दिसत होते ते अप्रतिमच होते. पूल तर अगदी बघण्यासारखे होते. २००१ साली या भागात झालेल्या ८. १ रिश्टरच्या भूकंपानंतर या मार्गाची अधिकच काळजीपूर्वक बांधणी करण्यात आली. डोंगरापासून थोड्या दूर मोठमोठ्या सपाट घळीत मोठमोठे गर्डर्स टाकून, त्यावर खांब उभारून पूल उभे केले आहेत. बऱ्याच ठिकाणी हे पूल

इंग्रजीतल्या आडव्या एस, सी किंवा यू या आकारात आवश्यक तसे वळवले आहेत. अत्यंत विलोभनीय असे दृश्य होते ते. जमीन खचण्याची किंवा तिची धूप होण्याची भीती वाटत होती म्हणून ही काळजी. असंख्य भूकंपमापक यंत्रेही या मार्गाच्या आसपास बसवण्य़ात आली आहेत.

आम्ही तिबेट्ला -ल्हासाला गेलो होतो तेंव्हा तिथे उन्हाळा होता. त्यामुळे डोंगरांवर किंवा मार्गावर जरी बर्फ नव्हते तरी डोंगरावरच्या प्रचंड घळी व पुलाखालची सपाट जमीन पाहून इथे खूप पाऊस व बर्फ पडत असणार याचा अंदाज येत होता. बघताबघता गाडी उतरणीला लागली. सूर्यही आपला दिवसभर पसरलेला सोनेरी किरणांचा पिसारा आवरून घ्यायला लागला. सहज बाहेर नजर गेली आणि आम्ही बघतच राहिलो. ल्हासाला गेल्यापासून ज्या बर्फाच्छादित शिखरांची मन आसुसून वाट पहात होतं ती शिखरं प्रथम दूरवर व नंतर गाडीच्या अगदी जवळ येऊन गाडीच्या दोन्ही बाजूंनी धावायला लागली. सायंकाळचा कलता सूर्य त्या चमकत्या हिमशिखरांना कोणाची नजर लागू नये म्हणून त्यावर आपल केशरी पांघरूण पसरत होता. त्याच्या पार्श्वभूमीवर ही धवल हिमशिखरं अवर्णनीय सुंदर दिसत होती. हिमालयाने आपले हिमाच्छादित रूप दाखवून मला अगदी तृप्त केले.





जन्मभर लक्षात
राहिल असा
देखावा प्रवासाच्या
शेवटी आमच्या
सोबत पळू लागला





जन्मभर लक्षात राहिल असा देखावा प्रवासाच्या शेवटी आमच्या सोबत पळू लागला आणि डोळ्याचं पारणं फिटलं. अर्धापाऊण तास तरी आमची नजर त्या देखाव्याने खिळवून ठेवली होती. कितीही बघितलं तरी मनाचं व डोळ्यांचं समाधान होत नव्हतं. सूर्यानेच शेवटी आपलं सोनेरी केशरी किरमिजी रंगाच पांघरूण काढून घेतलं, धरित्रीवर काळी उबदार शाल पाघरली आणि अंधारात बाहेरचं दृश्य लपून गेलं.

एव्हाना प्रवास पूर्ण होत आलाय व गोलमुड जवळ येत चाललं आहे हे दूरवर दिसणाऱ्या बारीकशा दिव्यांवरून व पाठोपाठ गाडीत होत असलेल्या सूचनेमुळे कळलं. कसे १४ तास संपले तेच कळलं नाही. वातानुकूलित, योग्य हवेच्या दाबाखाली प्रवास केल्याने अजिबात शीण आला नाही. गाडीच्या वेगाचा अजिबात आवाज नसल्याने आम्हा मुंबईकरांना थोडे चुकल्या चुकल्यासारखे वाटले इतकेच. एक दोन वेळ शिट्टीचा आवाजच काय तो ऐकू आला. बाकी मस्त! एकदम फ्रेश! गाडी कितीही आवडली तरी गोलमुड आल्यावर उतरावेच लागले आणि हे १४ तासांचे गोड स्वप्न संपले.



(पूर्वप्रसिद्धी: 'मस्त भटकंती- दिवाळी २०१४')


दुबई
एक जागा...
अद्भुत बागा!
MIRACLE



“वाळवंटात फुललेली बाग तुम्ही पाहिलीत का हो?” गाडी चालवता चालवता यशोधनने अचानक विचारलेल्या प्रश्नाला काय उत्तर द्याव हेच समजेना.

“ तू वेडा आहेस की काय? वाळवंटात बाग, तीही फुललेली? छे, काहीतरीच प्रश्न! ” अशीच काहीशी प्रतिक्रिया माझी होती! कारण वाळवंट म्हटले की डोळ्यासमोर येतो तो वाळूचा अथांग समुद्र, त्यावर उठणारी वाळूची वादळे, त्यामुळे तयार होणाऱ्या वाळूच्याच लाटा... क्वचित त्यात दिसणारी खुरटी, काटेरी टोकदार पानांची झुडुपं व कधीकधी दिसणारे ‘उंटावरचे शहाणे’. पण जेंव्हा ‘मिरॅकल गार्डन’ कडे यशोधनने गाडी वळवली तेंव्हा पाहिलेल्या आश्चर्याने दाही बोटे तोंडात गेली असे म्हटले तरी चालेल.

जेव्हां हाच माझा मुलगा – यशोधन – पहिल्यांदा दुबईला जायला निघाला, तेव्हां मी दुबईची अशीच काहीशी कल्पना केली होती. म्हणजे पूर्वी कधीतरी वाचलेली ‘अगदी नुसतेच वाळवंट व त्यात तुरळक घरे’ ही लहानपणची वाळवंटाची कल्पना मागे पडून आखाती देशातही उंच इमारती, सुखसोयीयुक्त घरे, दुकाने असतात पण बाकी सर्वत्र वाळू असे चित्र मनात रुजले होते. तिथल्या माती नसलेल्या वाळवंटात झाडे, फुलबागा वगैरे नसणारच याची खात्री होती. त्यामुळे सिंगापूर सारख्या फुलझाडांनी बहरलेल्या देशातून

प्रथमच दुबईला जाताना विमानातून उतरेपर्यंत “ बाईसाहेब आता सिंगापूरची हिरवाई, फुलझाडांची नयनरम्य आरास सगळे विसरा १५ दिवस” असे स्वतःलाच बजावत होते. दिवस नोव्हेंबरचे होते. उतरतांना रात्र असल्याने खाली फक्त दिव्यांचा चकचकाट व समुद्राच्या बाजूने चमकणाऱ्या दिव्यांची रोषणाई एवढेच दिसले होते. पण दुसऱ्या दिवशी उठून पहाते तर चौपदरी रस्ता, त्याला कापणारा दुभाजक दिसला. त्यावर शिस्तीत दोन रांगेत लावलेली हिरवीगार छोटी छोटी झुडुपे होती व त्यावर चक्क पिवळ्याधमक व लाल चॉकलेटी रंगाची फुले वाऱ्यावर डुलतांना दिसत होती. त्यांच्या मधूनच थोड्या थोड्या अंतरावर खजुराची पुरुष दीड पुरुष उंचीची झाडे आपल्या झावळ्या पसरून उभी होती. मुलाचे घर कॉर्निशवर - समुद्राच्या जमिनीत घुसलेल्या पट्ट्यावर - होते, त्यामुळे सूर्यप्रकाशात चमचमणारे पाणी, त्यावर मधूनच बोटींच्या येण्याजाण्याने उठणाऱ्या लाटा व मधूनच पटकन पाण्यापाशी सूर मारून मासा मटकवणारे समुद्रपक्षी, निसर्गचित्रात भरच घालत होते व दुबई म्हणजे फक्त वाळवंट व त्यातील घरे या कल्पनेला सुरुंग लावत होते. जसजशा माझ्या दुबईभेटी वारंवार होऊ लागल्या तशा दुबईतल्या वाळवंटाच्या कल्पनाही बदलत गेल्या. वाळवंटात फुले लाऊन त्याची निगा किती काळजीपूर्वक घेतली जाते याची कल्पना येऊ लागली. रस्त्याचे

डिव्हायडर, चौकातले राउंड अबाऊट किंवा फ्लाय ओव्हर्सचे उतार... काहीही सोडलं नव्हतं. उपलब्ध जागेचे आकर्षक लॅंडस्केपिंग करून त्यावर रंगीबेरंगी फुलझाडे, खजूराची झाडे लाऊन सगळीकडे मिनीबागांची रेलचेल करणे असा प्रकार जागोजागी पहायला मिळत होता. जितके पहावे तितके कमीच अशी परिस्थिती होती. बरं ही झाडे व फुलझाडे वाटेल तशी उगवलेली नव्हती हं! दगड विटा व वाळूचे उत्तम आखीव रेखीव आकारतयार करून, त्यात मऊ मुलायम लुसलुशीत हिरवळ लाऊन त्यात आकर्षक रंगसंगती करून लावलेली होती. फुलांची भरपूर विविधता पहायला मिळाली. समुद्राच्या कडेकडेने असणाऱ्या बऱ्याच ठिकाणी हिरव्यागार बागा, जॉगिंग ट्रॅक दुबईची शोभा अधिकच वाढवत होती.

इंग्लंड, अमेरिका, कॅनडा वगैरे ठिकाणी प्रचंड हिमवर्षाव होतो. तेथे बर्फाखाली गाडली गेलेली फुलझाडे व बागा हिवाळा संपला की परत फुलवाव्या लागतात. दुबईत हीच गोष्ट उन्हाळ्यात होते. ४-५ महिने तरी ४0$^{0}$ च्या वर तपमान जात असेल. त्या काळात दुभाजकांच्यावरच्या आणि छोट्या बागा उन्हाने अक्षरशः करपून जातात. तरीही मोठ्या बागा किंवा फुलझाडे आग ओकणारे ऊन, पावसाचे अत्यल्प प्रमाण, वाळूची वादळे यांना दाद न देता जिवंत रहातात याचं सर्व श्रेय इथल्या यंत्रणांना आहे.

खरंतर सभोवताली पाणीचपाणी दिसत असूनही “समुद्री चहूकडे पाणी पिण्याला थेंबही नाही “अशी अवस्था दुबईची! त्यामुळे इतक्या ठिकाणी फुलझाडे वाऱ्यावर डुलताहेत याचे खूप आश्चर्य वाटते. घराघरातून व कारखान्यांतून वाया जाणारे पाणी शुद्ध करून या बागांसाठी वापरले जाते. त्यासाठी ते ठिबक सिंचनाद्वारे किंवा जमिनीच्या अगदी वरच्या थराखालून मुद्दाम पसरलेल्या भोकाभोकांच्या नळयातून मुळापाशी पोहोचवले जाते व भर उन्हाळयातही त्यांना जिवंत ठेवते ही पद्धत खूपच कौतुकास्पद वाटली.





अनामिका बोरकर



मिरॅकल गार्डन म्हणजे खरोखर मानवनिर्मीत चमत्कार म्हणावा लागेल. सुमारे ८०, ००० चौ. फू. जागेवर बनवलेल्या आणि फेब्रुवारी २०१३ मध्ये सर्वांसाठी खुल्या झालेल्या या बागेत पर्यटकांची नुसती रीघ लागलेली असते. अप्रतिम हा शब्द कमी पडावा अशी ही वाळवंटातील अफलातून करामत 'दुबईलॅंड' या भागात आहे. तेथे पोहोचण्यासाठी एमिरेट्स मॉल पासून बस असल्याने तेथे पोहोचणे सोपे जाते. प्रक्रिया केलेल्या सांडपाण्याचा ठिबक सिंचन प्रकाराने वापर करून सर्वत्र हिरवीगार हिरवळ निर्माण केली आहे. रंगीत फुलझाडे मात्र बऱ्याच प्रमाणात छोट्या छोट्या कुंड्यात वा भांड्यात लावलेली आहेत. त्यामुळे उन्हाळ्यात ती सुरक्षित जागी हलविणे सोपे जाते. उन्हाळा संपल्यानंतर ती बागेत परत मांडताना रचना बदलता येत असल्याने, पुनः भेट देणाऱ्या अभ्यागतांना दरवेळी नवीन रचना पाहण्याचा आनंद मिळतो.

या बागेत हिरवळीखेरीज छोटे छोटे तलाव, त्यात जलचर पक्षी, फ्लेमिंगो, कारंजी व सर्वत्र दिसणारी फुले मन वेडावून टाकतात. बागेत नुसत्या जमिनीवरच्या कुंड्याच आहेत असे मात्र नाही. मोठमोठ्या कमानीतील टोपल्यांत बसून थंडगार वाऱ्यावर डोलणाऱ्या फुलांनी आमचे लक्ष वेधून घेतले. कमानींवर हिरव्यागार वेली, पुष्पलता मुद्दाम चढवल्या होत्या. त्यात मूळच्या वेताच्या कमानी लपून गेल्या होत्या.

त्याखालून जाणारा स्वच्छ लालचुटुक पेव्हर ब्लॉकचा रस्ता अगदी चित्रातल्यासारखा दिसत होता. त्या कमानींखालून जाताना खूपच छान वाटले. पायाखाली लाल पायघड्या, बाजूला व डोक्यावर लोंबणाऱ्या वेली, वाऱ्यावर डुलणारी फुले, त्यांचा मंद सुगंध आणि मधूनच येणारी वाऱ्याची थंडगार झुळूक आपल्याला स्वप्ननगरीत घेऊन जातात.

कमानीशिवाय इतरही खूप वेगवेगळे आकार तयार करून त्यावर फुले व वेली चढवलेल्या आहेत. पिरॅमिड, फेरारी मोटार, ४ डब्यांची आगगाडी, दिव्यांच्या शेड, आयफेल टॉवर, सफरचंद, कमळे, सूर्यफुले असे असंख्य आकार तयार करून फुलांनी सजवलेले दिसले. एक मोठी बोटही आहे जिच्या नांगराला फुलांच्या परड्या लोंबकाळत होत्या. एका तळयाच्या काठावर बसून झाडांना झारीतून पाणी घालणाऱ्या मुलीचे शिल्पही फार आकर्षक आहे. तिच्या केसांच्या फुलांच्या बटा अलगद पाण्यात उतरल्या आहेत. त्यांच्या रंगाचे मिक्सिंग अतिशय सुंदर जमले आहे. तिचा गोरापान रंग लाल पांढरी फुले व हिरवी गार पाने यांनी तयार झालेल्या फ्रॉकवर उठून दिसत होता. शेजारच्या तळयातल्या मुलीचे मात्र अश्रू फुलांच्या रूपाने पाण्यात उतरत होते. तिचा चेहरा, केस सगळयाची रंगसंगती अतिशय सुंदर होती, ते दृश्यही खूप छान होते.

परंतु इतक्या सुंदर बागेत बसून ही का बरे रडत असावी हा प्रश्न मनात सलतच राहिला. एके ठिकाणी १३ मी. व्यासाचे भले मोठे फुलांचे घड्याळ आहे. त्यातले पांडरे ठसठशीत आकडे गुलाबी, लाल रंगाच्या फुलांच्या पार्श्वभूमीवर उठून दिसत होते. हिरव्या पानांची व चॉकलेटी रंगांच्या फुलांची गोलाकार कड घड्याळाला उठाव देत होती. घड्याळाच्या मधोमध बसलेला छोटासा पक्षी दर १५ मिनिटांनी चिवचिवाट करून त्याचे अस्तित्व दाखवत होता.

अरेबियन डिझाईनची वैशिष्ट्यपूर्ण कमान आम्हाला तिकडे खेचत होती. तिकडे गेल्यावर वेगळीच गंमत पहायला मिळाली. बुर्ज खलिफाची प्रतिकृती, पालथे अर्धगोल (डोम) टपोरी केशरी संत्र्यांनी व पिवळयाधमक लिंबानी सजलेले होते. हिरव्यागार वेलींच्या मधून ही पिवळीधमक लिंबे, संत्री बागेची शोभा आणखीच वाढवत होती. सगळे बघता बघता वेळ कसा जातो कळतच नाही. परतीच्या वाटेवर माथेरानच्या टॉय ट्रेनची आठवण करून देणाऱ्या आगगाडीने तिच्यावरील फुलांच्या रंगांनी लक्ष वेधून घेतले. इंजिनाशेजारी उभा ड्रायव्हर हात उंचावून आपल्याला निरोप देतो व नुसती चक्कर मारायच्या उद्देशाने बागेत शिरलेले आपण उल्हसित मनाने पण थकलेल्या पायांनी बागेबाहेर पडतो. अर्धा दिवस तरी फुलांच्या राज्यात

सहज संपतो. मन तृप्त झाल्यावर पोटपूजेची आठवण झाली. इथे खानपान सेवा असणार हे तर उघडच होते. वेगवेगळी दुकाने विविध पदार्थ तयार करून आपली भूक आणखीनच वाढवत होती. हा भागसुद्धा वैशिष्ट्यपूर्ण व बागेची शोभा वाढवणाराच होता. लोकांना क्षुधाशांती करण्यासाठी आरामदायी वाटिका तयार केल्या आहेत. त्यामध्ये ऊन लागू नये म्हणून रंगीबेरंगी छत्र्या उलट्या टांगून त्यांच्या दांड्यांना फुलांच्या परड्या लटकावलेल्या होत्या. नुसत्या वासाने चाळवलेली भूक पोटभर भागवून तिथून बाहेर येतांना मागे वळून पहाण्याचा मोह काही आवरत नाही. ३० डिरहॅमचे तिकिट काढतानाची सुरुवातीची चुटपुट बागेत कधीच हरवून गेलेली असते. मन भरून प्रसन्नता, फुलांचा दरवळ, फुलपाखरांचे विविध रंग... कितीही वर्णन केले तरी कमीच! ‘Largest Vertical Garden’ अशी गिनीज बुकमध्ये नोंद झालेली हे उद्यान म्हणजे वाळवंटातील खरोखर ‘मिरॅकल’ आहे यात संशय नाही.

बागेच्या विकसनातील ‘मिरॅकल गार्डन’ हा पहिला टप्पा होता. मार्च २०१५ मध्ये या बागेच्या शेजारील सुमारे ४००० स्क्वे. मी. च्या परिसरात दुसरी फेज आकाराला आली. ती म्हणजे `Dubai Butterfly Garden’.



अनामिका बोरकर

Dubai Butterfly Garden’.





मिरॅकल गार्डन व ‘बटरफ्लाय गार्डन’ शेजारी शेजारी असले तरी त्यांची प्रवेशद्वारे, प्रवेश शुल्क आणि रांगाही वेगवेगळ्या आहेत. दोन्ही बागांची थीम भिन्न आणि म्हणून अतंर्भागातील सुशोभीकरणाचे प्रकारही भिन्न. दाराशीच एक भले मोठे फुलपाखरू आपल्या विविध रंगांनी पर्यटकांना आकर्षित करते. त्याला फोटो व सेल्फी काढून हैराण केल्यावरच आपण आत शिरतो. आतमध्ये जिकडे बघावे तिकडे रंगीबेरंगी फुलपाखरांचे कट आऊट्स दिसतात. त्यावर विविध रंगी फुलांच्या कुंड्या ठेवून त्यात रंग भरले आहेत. रंगीत फुलांवर नाचणारी फुलपाखरे अतिशय विलोभनीय दिसतात. जरा पुढे गेल्यावर विविध रंगी ९ मोठे डोम दिसले. हे डोम म्हणजे फुलपाखरांसाठी तयार केलेली उत्तम घरेच म्हणाना. फुलपाखराना २०$^{0}$ ते ३०$^{0}$ तपमान आवश्यक असते. दुबईत ते अशक्यच! त्यासाठी डोममध्ये २४$^{0}$ से. तपमान कायम ठेवले आहे. डोममधल्या बागेत आमचे स्वागत वेगवेगळ्या फुलपाखरांनी केले. खरे तर त्यांना आमच्या खांद्यावर, डोक्यावर बसून मैत्री करायची होती. पण आपल्याला एकदम दचकायला होते ना! तिथे असणारे स्वयंसेवक आपल्याला फुलपाखराला किती हळुवारपणे हाताळणे आवश्यक आहे, त्यांना अजिबात इजा न करता कसे पकडायचे हे दाखवतात. हे पहिलेच बटरफ्लाय गार्डन असावे, जिथे अभ्यागत फुलपाखरे हाताळू शकतात.

या डोममध्ये २४ देशातून आणलेली विविध प्रजातींची फुलपाखरे गोळा केली आहेत. छोटी मोठी फुलपाखरे आपल्याभोवती रुंजी घालतात. आपल्याला उगीचच आपण फुलासारखी सौंदर्यवती असल्यासारखे वाटते. या फुलपाखरांसमवेत छोटी छोटी गोबरी मुलेही गमतीजमती करत असतात, आनंदाने चीत्कारतात. मोठी मजा येते.

या डोमच्या मधोमध फुलपाखराच्या आकाराचे एक म्युझियम आहे. या म्युझियमलाही फुलपाखरांच्या आकारात त्रिमिती पद्धतीने फुलांच्या वेगवेगळया डिझाइन्सने सुशोभित केले आहे. तेथे अनेक भिन्न भिन्न कीटक, फुलपाखरे, यांच्या जाती व प्रकार पहाता येतात. शिवाय म्युझियममधील काचेच्या घरात फुलपाखरांचे जीवनचक्रही नीटपणे अभ्यासता येते. या विभागात बरीच मुले व त्यांना माहिती देणारे पालक यांची गर्दी होती. या बागेत ३ तळीही आहेत. या तळ्यात ‘कोई’जातीचे मासे सोडलेले आहेत. दहा वेगवेगळया रंगांच्या या माशांचे पोहणे, मधेच पटकन पाण्याच्या पृष्ठभागावर येणे, सुळकन पाण्यात शिरणे, कधी गप्पा मारायला एकत्र येणे व भांडण झाल्यास तडकाफडकी पाठ फिरवून निघून जाणे... सारेच विलोभनीय !

४000 चौ. मी. चे गोलाकार बटरफ्लाय गार्डन पहाता पहाता दमणूक तर होतेच पण तहान भूकही लागते. अर्थातच त्याचीही सोय येथे आहेच. आणि घरी परतताना फुलपाखरांची आठवण सोबत नको का? त्यांना तर नेणे शक्य नाही, पण त्यांच्या प्रतिकृती तर आपण घेऊ शकतोच ना! फुलपाखरांची रंगीबेरंगी व वेगवेगळ्या आकारातली भिंतीवर लावावयाची चित्रे, फ्रीजवर लावण्यासाठीचे लोहचुंबक, की चेन्स, टी शर्ट, स्कार्फ वगैरे घेण्याचा मोह पाडणारे एक भेटवस्तूंचे दुकानही आहे. या बटरफाय गार्डनचे तिकीट ५० दिरहॅम असूनही फुलपाखरांच्या आकर्षणामुळे तिथे भेट देणाऱ्यांची गर्दी खूप आहे.

मिरॅकल गार्डनच्या तिसऱ्या टप्प्याचे म्हणजे ‘हवे तेवढे पहा, हवे तेवढे तोडा व (पैसे देऊन) घेऊन जा’ या तत्त्वावर उभारण्यात येणाऱ्या फळभाजीच्या बागेचे, त्यातच असणाऱ्या रोलर कोस्टर, मेरी- गो- राऊंड वगैरे मुलांच्या करमणूकीच्या साधनांनी युक्त अश्या बागेचे कामही सुरू झाले आहे. ते लवकरच पूर्णत्वाला जाण्य़ाच्या मार्गावर आहे असे समजले.

या दोन्ही बागांचे वारा, वाळूची वावटळ व वाळूकणांपासून रक्षण करण्यासाठी अगदी सोपी युक्ती वापरलेली आढळते. मुख्य रस्त्यापासून दोन्ही बागांकडे येणाऱ्या छोट्या रस्त्याच्या दोन्ही बाजूंना १०-१५ फूट उंचीची अगदी दाट झाडे लावली आहेत. या झाडांमुळे एका छानशा कॉरिडॉरमधून आपण जातो हे तर छान वाटतेच, पण जवळच मोठा रहदारीचा रस्ता असूनही वाहनांच्या आवाजाचा अजिबात त्रास होत नाही व बागेचे संरक्षणही उत्तमरीत्या होते...

असेच आणखी एक, दुबईतील 'झाबील पार्क'चा स्वतंत्र भाग असणारे आगळे वेगळे सुंदर उद्यान World's First Unique Themed Park म्हणून ज्याची नोंद झालेली आहे ते Dubai Glow Gareden.



नुकतेच २२ डिसें. २०१५ला त्याचे उद्घाटन झाले. रमादानपर्यंत ही बाग प्रेक्षकांचे मन रिझवणार आहे. या वर्षीची थीम आहे: ‘केनियन सफारी, नेदरलँडची ट्यूलिप व इतर मनमोहक फुले.’ येथे जगातील सुमारे १५० कलाकारांनी एकत्रित २००, ००० तास काम करून व ३ कोटी दिरहॅम खर्च करून जवळपास ४० एकर जागेत ३२ वेगवेगळ्या रचना साकार केल्या आहेत. याखेरीज येथे लेझर फाउंटन शो, चकचकीत चंदेरी कपडे घातलेल्या कलाकारांचा लाईव्ह परफॉर्मन्स संध्याकाळच्या आल्हाददायी वातावरणाला अधिकच आनंददायी बनवतात. वापरून टाकून दिलेल्या सामानातून कला निर्माण होऊ शकते हे लोकांच्या मनावर बिंबविण्यासाठी हा खटाटोप! दिवसाच्या उजेडात बागेचे रंग कसे दिसतात हे पहायला आम्ही मुद्दाम जरा लवकरच बागेत प्रवेश केला होता. पटकन एक चक्कर मारून येऊ असे म्हाणत आत शिरलेले आपण बघताबघता बागेतील रंगीबेरंगी प्राणी, झाडे, फुले, बदके यात रमून जातो. जबडा वासलेले व चीत्कार करणारे अनेक अक्राळविक्राळ डायनॉसॉर बघून आपण नकळत तिथून पळ काढतो. हे डायनॉसोर खोटे आहेत हे माहिती असूनही आपण घाबरतो हे मात्र खरं! अगदी मुलांपेक्षा मूल होऊन आपण या जगात हरवून जातो. हे सगळे अनुभव बऱ्याच वर्षांनी आल्याने खूप मजा वाटली. बराच वेळ बागेत भटकून आम्हीपण दमलो होतो.



तेवढ्यात पहाता पहाता दिवस मावळला व संध्याकाळच्या केशरी, लाल, पिवळ्या प्रकाशाने आकाश व्यापून टाकले. या संध्यासमयी बागेचे रंग वेगळेच दिसत होते. बघता बघता आकाश निळ्या काळ्या रंगाने झाकोळून गेले व अंधाराच्या पार्श्वभूमीवर बागेचे वेगळेच रूप दिसले. झाडांच्या अंगाखांद्यांवर कुंपणाच्या कडेने लाखो छोटे मोठे रंगीबेरंगी एल ई डी दिवे लखलख करू लागले व आकाशातल्या चांदण्याच आपल्याला जमिनीवर उतरून वाट दाखवताहेत असा भास झाला. परत एकदा आम्ही बागेकडे वळलो व दिवसा बघितलेलीच बाग नव्याने पहायला सुरुवात केली.

अगदी दारातच आम्हाला दुबईची स्कायलाईन असणारी इमारतींची बाह्य रेषा दिसली. १४ मी. उंचीच्या, बुर्ज खलिफाच्या निमुळत्या स्तंभाने आमचे लक्ष वेधून घेतले. त्याचे उंची-आकारमानाचे प्रमाण तर उत्तम जमले आहेच पण त्या आकारमानानुसार इतर इमारतींची बाह्य रेषाही उत्कृष्ट जमली आहे. या इमारतींच्या कडांवर लावलेले दिवे लांबूनसुद्धा खूप सुंदर दिसतात. या बुर्ज खलिफाची निर्मिती विविध औषधांच्या अंदाजे ३,३०,००० रिकाम्या बाटल्यांपासून केली आहे हे समजल्यावर या कृतीच्या निर्मात्याच्या कल्पकतेला दाद द्यावीशी वाटली.



बागेच्या आतल्या भागाकडे वळलो तो २-३ मोठ्या कृत्रिम झाडांच्या शेजारी एक बोलणारे झाड समोर आले. हिरव्या झाडांच्या पार्श्वभूमीवर हे पिवळसर केशरी झाड उठून दिसत होते. बुंध्याच्या वरच्या भागात डोळे, भुवया, पापण्यांसह प्रमाणबद्ध चेहेरा साकारला होता. त्यावरच्या व खोडावरच्या चॉकलेटी रेषा त्याचे वाढलेले वय निर्देशित करीत होत्या. त्याच्या शरीरातून उजळून टाकणारा प्रकाश एक प्रकारचे समाधान व तृप्ती दाखवत होता. त्याच्या डोळयांच्या बाहुल्या हालचाल करून येणाऱ्या जाणाऱ्यांची दखल घेत होत्या. आपल्या तोंडून निघालेले आश्चर्योद्गार पुनः त्याच्या तोंडून ऐकू येत होते. लहान मुलांबरोबरच आम्ही मोठी माणसेही त्याला हाय, हॅलो करत होतो. पिवळ्या व हिरव्या अर्धपारदर्शी रेशमी कापडांची बनवलेली ही झाडे अंधाराच्या पार्श्वभूमीमुळे व आतून प्रकाशमान होणाऱ्या उजेडामुळे उठून दिसत होती. हिरव्या झाडांची व पिवळ्या बोलणाऱ्या झाडांची उघड्या छत्रीसारखी पसरलेली पानेही उज्ळून निघाली होती. ही पानेही रेशमी हिरव्या पिवळ्या कापडांच्या सांगाड्यावर लावलेल्या पाण्याच्या रिकाम्या बाटल्यांची बनवलेली पाहून खूपच कौतुक वाटले.



बोलणाऱ्या झाडानंतर अचानक पाटी समोर आली... BEWARE OF DINOSAURS! मघाशी आम्ही दिवसा ह्या भागात येऊन गेलो होतो त्यामुळे यावेळी थोडे शूरपणाने आत घुसलो. आता या भागात डायनोसॉर चे ओरडणे व अंधुक प्रकाश यामुळे वातावरण थोडेसे भीतिदायक झाले होते. आम्ही पायवाटेने पुढे गेलो तर अंधारात काही हालचाल दिसली. ते काय असावे याचा विचार करतोय तोच आमच्यापासून अचानक ३-४ फूट अंतरावर हवेत काहीतरी आडवे फिरले. एक पाऊल मागे सरलो तेव्हा लक्षात आले की ती डायनोसॉरची भली लांब काटेरी शेपटी होती. ती मागे गेली अन त्याचा वासलेला अक्राळ विक्राळ जबडा पुढे आला. त्याचे अणकुचीदार दात व लालभडक जीभ पाहून धडकीच भरली! त्याची मोठी गर्जना ऐकून तिथून पळालो खरे पण लगेच दुसऱ्याच्या तावडीत सापडलो. हा डायनॉसॉर तर सगळीकडे पुढे मागे फिरत, नाचत होता, कुंपणाबाहेर तोंड काढून मुलांच्या टोप्या, हातातला खाऊ खेळणी पकडण्याचे नाटक करीत होता. त्याचा आवाज ऐकताच पुढे झेपावणारी बच्चे कंपनी एकदम आईबाबांच्या मागे लपत होती. कोणी फोटो काढत असेल तर मस्त पोझही देत होता. सगळे पाहून गंमत वाटत होती. एके ठिकाणी उभारलेला तंबू,

शेकोटी, डायनोसॉरने धडक मारून मोडतोड केलेली गाडी शेजारी उभी, असे दृश्य... खोटेखोटेच, पण त्या भागातून बाहेर पडल्यावर हायसे वाटले हे खरे! एकच ठिकाण पण दिवसा व रात्री कित्ती वेगळे दिसले!



पुढचा भाग केनियन सफारीचा होता. त्यामुळे छोटीशी झोपडी, एक दोन झाडे, जंगल, तळे व त्यातले प्रकाशमान असलेले ‘बिग फाईव्ह’. जिराफ, हरणे, झेब्रे तर होतेच, पण भले मोठे हत्ती, चित्ते, तळ्याकाठी पाणी प्यायला येणारे वाघ सिंह वगैरेही त्यांच्या योग्य आकारमानाप्रमाणे होते. त्यांचे रंग प्रकाशामुळे उठून दिसत होते. शिवाय झाडांवर फुले, माकडे, विविध पक्षी, तळ्याकाठी छोटे ससे तर तळ्यात बदके व कमळेही होती. एके ठिकाणी वनराज आपली राणी व दोन राजपुत्रांसह दिमाखात खडकावर विराजमान झाले होते. झोपडीजवळ मोठमोठ्या म्हशी चरत होत्या. झोपडीबाहेर २ गोंडस मुले खेळत होती व त्यांचे आईबाबा त्यांच्या लीला पाहुन हसत होते. सगळेच खूप छान होते. जंगल सफारीचे पूर्ण दृश्य डोळ्यात साठवून आम्ही पुढे सरकलो.



पुढचे दृश्य अगदीच वेगळे होते. सिंगापूरला लॅटर्न फेस्टिवलमध्ये बरेच प्राणी, फुले, झाडे आकाशकंदिलाच्या स्वरूपात पाहिले होते. पण इथे प्रथमच मुंग्यांची भली मोठी रांग बघितली. काळसर चॉकलेटी डोके, काळे डोळे, लाल पोट व पिवळे पाय अशा २-३ फूट उंचीच्या मुंग्यांची रांग समोर दिसत होती. एका पडलेल्या झाडाची पाने काही मुंग्यांच्या पाठीवर होती, तर काहींच्या पाठीवर साखरेचे कण. काही जणी फळे, मिठाईचे, पावाचे तुकडे नेत होत्या. सगळयाजणी एका भल्या मोठ्या वारुळाकडे जात आहेत, वारूळाच्या भोकातून त्यांची छोटासा मुकुट घातलेली राणी मुंगी त्यांच्याकडे बघत आहे असा अप्रतिम देखावा... कितीही वेळ पाहिला तरी मन तृप्त होत नव्हते. सगळे दृश्य त्या ठिकाणी उभे राहून डोळयात साठवतांना शेवटी पायाला मुंग्या आल्या तेव्हाच आम्ही पुढे सरकलो.





पुढे होता एका मोठा तळ्याचा देखावा. त्यात विहार करणारी बदके व हंस, फुललेली विविध रंगांची कमळे, कमलपत्रांवर उडी मारून बसलेले बेडूक, कमळांभोवती रुंजी घालणारे भुंगे व मधमाश्या... जितकं वर्णन करावे तेवढं थोडंच. एव्हाना रात्र झाली होती. त्यामुळे सगळे जास्तच उजळून निघाले होते. तेवढ्यात लाईट व साउंडचा शो सुरू झाला. छान सुरेल संगीत व प्रकाश आणि सावल्यांचे खेळ मोठे मनोहर दिसत होते. इकडून तिकडे धावणाऱ्या उजेडाच्या झोतांनी काठावरची झाडे मधून मधून उजळून वेगवेगळे रंग दाखवत होती. २-३ झाडांवर विविध रंगांची फुले उमलली होती. एकंदर खूपच नेत्राकर्षक दृश्य होते ते. हा खेळ रंगात आला असतानाच तळ्यात उभारलेल्या स्टेजवर चंदेरी कपडे घातलेले नर्तक तालात पावले टाकत अवतरले. त्यांच्या नृत्याच्या हालचाली मनोवेधक होत्या. मधुर संगीत, उजळलेली बाग, तळ्यातील कमळे सगळेच आकर्षक!

उरोस,तिबेट, दुबई





शो संपताच परतीच्या वाटेला लागलो तो, समोर मशिदीची भलीमोठी पांढरी शुभ्र प्रतिकृती दिमाखात उभी दिसली. जवळ जाऊन पाहिले तर दुरून संगमरवरी वाटणाऱ्या शुभ्र भिंती प्रत्यक्षात पोर्सिलीनच्या टाकून दिलेल्या कप, बशा यांच्या बनवलेल्या होत्या. जवळ जवळ ९०,००० असे तुकडे वापरले गेले आहेत यासाठी. तसेच बागेतील प्राणी, पक्षी, दृश्ये सर्व रीसायकल्ड सिल्कची बनवली आहेत आणि जवळ जवळ ४० लाख वीज वाचवणारे बल्ब वापरले आहेत. प्रत्येक वस्तूचा पुनर्वापर करा, वीज वाचवा, पर्यावरणाचा तोल सांभाळा असा जगभर प्रचार होत आहे, पण इतक्या मोठ्या बागेच्या रूपाने असा मनोरंजक संदेश देणारा उपक्रम मी प्रथमच पाहिला... आणि तोही वाळवंटात!! ६० डिरहॅम तिकीट – बाहेर पडतांना 'फक्त ६० दिरहॅमच' असे वाटून गेले. या कल्पक शिल्पकारांचे कौतुक करावे तेवढे कमीच!

या तीन बागा म्हणजे कलात्मकतेचा खरोखरीच उत्तम नमुना आहे. मुलांच्या खेळण्यांनी युक्त, फुलांची पखरण असणाऱ्या इतरही बऱ्याच बागा दुबईत फुलवलेल्या आहेत पण या तीन बागा जरा हटकेच आहेत!

**(पूर्वप्रसिद्धी: 'साप्ताहिक सकाळ १६ एप्रिल २०१६')**

## दुर्ग दुर्घट भारी

आसेतूहिमाचल

## सुंदर हा देश

त्या सुंदर यात्रेसाठी

www.esahity.com वर महाराष्ट्र, भारत व जग प्रवासाची अतिशय सुंदर प्रवासवर्णनं आहेत. तुमच्याआमच्यासारख्या लोकांनी आपापले प्रवास अनुभव शब्द आणि छायाचित्रांतून मांडले आणि पाठवले. ई साहित्यच्या टीमने त्याची सजावट वगैरे करून त्यांना पुस्तकरूप दिलं. अशी शंभराहून अधिक पुस्तकं आता ई साहित्यवर आहेत. आणि ही संख्या काही हजारांत जाईल याची आम्हाला खात्री आहे. कारण...

कारण आपण लिहीणार आहात. आपण जिथे जिथे फ़िरायला जाल तिथले फ़ोटो व वर्णनं पाठवा. आपण जिथे रहाता त्या परिसरातील ठिकाणांचे फ़ोटो व माहिती पाठवा. ते प्रसिद्ध पर्यटनस्थळ असेल

वा नसेल. तुम्हाला ते स्थळ आवडलं ना? मग लिहा. पाठवा. अलंकारिक भाषेची चिंता करू नका. बाकी सगळं आम्ही बघून घेऊ.

संपुर्ण जग, संपुर्ण भारत देश, महाराष्ट्रातला प्रत्येक जिल्हा, प्रत्येक तालुका आणि प्रत्येक गाव सुंदर आहे. आणि त्याचं सौंदर्य पाहू शकेल असा कोणीही दिव्यदृष्टीचा पाईक आमच्या या “मी पाहिलेला…” सिरीजमध्ये भाग घेऊ शकतो.

याचा फ़ायदा त्या त्या ठिकाणाला भेट देणाऱ्यांना होईल. किंवा परदेशात राहणाऱ्या मराठी वाचकांना त्या जागेला भेट दिल्याचा आनंद मिळेल. किंवा प्रकृती अस्वास्थ्यामुळे फ़िरू न शकणारे जीव त्याचा आनंद घेतील. वाटा. आनंद वाटा. वाटा आणि वळणांचा आनंद वाटत रहा.

आपल्या लेखनाची मेल व foto पाठवा.

esahity@gmail.com